# पैसाफंड मेळ्याचीं पदें

पद पहिलें

प्रभु उदार पतित धीर करुणाकर प्रेमसार चुकत सतत शिशुस्वभाव जगत करित असुख ठाव विभव-हीन अबल दीन त्राहि त्राहि करित स्तवन परिसुनी वितरुनी हरुनि ताप दुरितभार जीवन दे प्रभु उदार ॥१॥

++++++

पद दुसरें

आज घेई प्रभु अवतारा। दीन जनांच्या भू-माहेरा ॥ध्रु०॥ नुरलें कांहीं शुद्ध स्वदेशी। भारतवैभव हो विदेशी॥ हिंदवासी कितिक उपाशी मायबांधवा सावरा ॥१॥ स्वातंत्र्याचा कुठला वारा। परवश जीवन सैरावैरा॥ दया करावी करुणसागरा। पतित पामरा सावरा ॥२॥

+++++++

पद तिसरें

[illegible] सांग कधीं आतां घेणार। तुज-विण कोण हरी आज हरिल हा भू-भार ॥ ध्रु०॥ गेलें विलया वैभव सारें। व्यर्थ जहालें जीवन हें अजि नच मान आम्हां होय हें जिणें लाचार ॥ १ ॥ झाले जन हे दुःखित दुबळे। त्राण मुळीं ना त्यांत उरे। निशिदिनीं प्राण जात अंत किति हरी बघणार ॥ २ ॥

++++++

REFBK-0003723

पद चवथें

आर्यावर्त हा। प्रभुसि अखिल जगीं गमे प्रिय महा ॥ ध्रु० ॥ उन्नतियोगें स्वर्गा गांठी। देत साक्ष नित हिमालय पहा ॥ १ ॥ भागिरथी ये स्वर्गावरुनी। पुण्य-कीर्तीचा प्रभाव अवघा ॥ २ ॥

++++++

पद पांचवें

प्रभु तारि जो त्रिलोका। रुसला अम्हांवरी कां? ॥ ध्रु० ॥ दैवा तशीच देवा। करुणा कुणा नये कां? ॥ १ ॥ भ्याल्या जिवा विसांवा। तुजवीण कोणि द्यावा ॥ २ ॥ धरि दैव दुष्ट दावा। देवा सुदीन दावा ॥ ३ ॥

++++++

पद सहावें

आर्यभूमि माता ही भावें भजा ॥ ध्रु० ॥ जननीपूजा याविण तनया। धर्म सनातन नाहीं दुजा ॥ १ ॥ प्रभु-संतोषा जननीसेवा। विभव सुमंगल पावे प्रजा ॥ २ ॥

++++++

पद सातवें

करुणाघना। अति सत्वरीं। ये श्रीहरी ॥ ध्रु० ॥ अभयदाना। दे या जना। दीन नाथा ॥ १ ॥ झणिं विनाशा। ने ही दशा। हे दयाळा ॥ २ ॥

++++++

पद आठवें

वंदुनियां शिवपदा। शुभपदा स्मरूं या ॥ध्रु०॥ जन-पदा सदा या। शौर्य तेज द्याया ॥ देवता स्वतंत्रता। मूर्त ही पुजूं या ॥ १ ॥ कर्मवीर थोर हा। स्फूर्तिसिंधु कीं महा। अवनितलीं अवतरे। आपदा हराया ॥ २ ॥

++++++

REFBK-0003723
REFBK-0003723

पद नववें

हीनदीना उद्धराया। या जना करा सहाया ॥ ध्रु०॥ देशबांधव क्लेशपंकीं पारखे ज्ञानामृता। द्या दयेचा हात त्यांना भ्रांत का समता वराया ॥ १ ॥ देशधर्महि एक असतां दुरि वृथा कां लोटितां। धांवुनी द्या धीर त्यांना यातना नाना हराया ॥२॥

++++++

पद दहावें

स्मरूं त्रैलोक्यनाथाला। करूं या लोककार्याला। हरूं या देशदैन्याला। वरूं या शांतिसौख्याला ॥ ध्रु०॥ जपोनी मंत्र आनंदें। मुखानें 'मातरम् वन्दे'। धरूं या कर्ममार्गाला। नुरे निर्बंध जीवाला ॥ १ ॥ दिनांच्या दिव्य सेवेचा। अनाथां साह्य देण्याचा। सुपथ हा स्वोन्नतीशैला। सुखाचा लाभला सकलां ॥ २ ॥

++++++

पद अकरावें

घ्याल स्वदेशी माल। जनहो। अंतीं सुख पावाल ॥ ध्रु० ॥ देश धुवोनि गेला सारा। कठिण येइ हा काल ॥ १ ॥ कौशल्याची करुनी माती। सौख्य कसें भोगाल ॥ २ ॥ निश्चय करुनी आपण सगळे। वापरु देशी माल ॥ ३ ॥

++++++

पद बारावें

दिव्य झेंडा भारताचा जगतिं नाचवा। भगवा ॥ध्रु०॥ त्यागाचीही जिवंत ज्योती। हृदयिं वागवा। शिवशाही-चा कीर्तीध्वज हा उंच फडकवा ॥ १ ॥ स्वातंत्र्याची प्रेरक स्फूर्ती। त्रिजगीं ऐकवा। कर्मयोग कीं महाराष्ट्राचा। लोकिं गाजवा ॥ २ ॥

पद तेरावें

कधीं येशी बोल। सदया। मायभू विलोल पडली दास्यपंकिं खोल ॥ध्रु०॥ तुजवीण वद कवणा। हाक मारि राजिवनयना। झणि धांव पाव करि करुणा। करुणाघन आवरि तोल ॥ १ ॥

++++++

पद चवदावें

करुणेश कृपानिधि भोला। धांवला पतितहांकेला ॥ तुजविणें दया कोणाला। ना वत्सला! भवाला ॥ हरिशील संकटाला। आशा! प्रभो आम्हांला ॥ १ ॥

++++++

पद पंधरावें

तुज याचना। करुणाघना। झणिं ये भगवाना ॥ ध्रु० ॥ स्वातंत्र्याची सुधा पाजुनी। भारतमाता जगवी दीना ॥ १ ॥ झाली सदया विगतविभव ही। तुजविण इतरा विनवूं कोणा ॥ २ ॥

++++++

पद सोळावें

शरण जाऊं तुजविण कवणा। का गजवदना येइ न करुणा ॥ ध्रु०॥ ना वाली दीना। बहु झाली दैना। दाखवि देवा सुदिना ॥ १ ॥ आपत्ती नाना। जीवा सोसेना। धांवुनि ये याचि क्षणा ॥ २ ॥

++++++

पद सतरावें

प्रेमें पुजुनियां। भावें भजूं तया ॥ध्रु०॥ थोर शिवाजी राजा आमुचा। प्यार अम्हां प्राणाहुनि जागिं या ॥ १ ॥ मानधनाची मूर्ति शिवाची। स्फूर्ति दिव्य सकलां शिवराया ॥ २ ॥

++++++

पद अठरावें

सुमनें मनें। आतां ॥ ध्रु०॥ वाहुं स्वदेशा जनतानाथा ॥ १ ॥ क्षालन करुं या। कृतापराधा ॥ २ ॥ देउ विखरुनी। ऐक्यसुगंधा ॥ ३ ॥

++++++

पद एकोणिसावें

पदरता भययुता विनता। प्रभुवरा ! आतां तारी जनता ॥ ध्रु० ॥ सदयता वरी अनाथनाथा !। तूंचि त्राता दैवहता ॥ १ ॥ येई धांवुनी श्रवुनि अनंता। करुणावंता दैन्यकथा ॥ २ ॥

++++++

पद विसावें

"दीनरक्षणाला। धांवला दयाळा !"। तो तुझा जिव्हाळा। कां न आज बोला। पतितवत्सला ! तूंच कारुण्यसिंधू भवाला ॥ ध्रु० ॥ मायदेश संकटांत ॥ छल सहवे का निर्भ्रांत। कितिक अंत बघसि शांत;। ना संत माया कुणाला ॥ १ ॥

++++++

पद एकविसावें

कहर गुजरला आजि या काला। काळ सुखाचा कैसा फिरला ॥ ध्रु०॥ तन मन धन द्या जनकार्याला। देश विकल हा रिझवायाला ॥ १ ॥ पुजिलें जनता-जनार्दनाला। जन्म सफल तरि हा झाला ॥ २ ॥

++++++

पद बाविसावें

स्वदेशार्थ सारे करूं यत्न आतां। सफला ही तेणें मनुजता ॥ ध्रु० ॥ बल अल्प भारी। सुगुणें भिकारी। तरि भक्तियुत वृत्ति आहे समर्था ॥ १ ॥

++++++

पद तेविसावें

" देश माझा जिवलग राजा " भोळी भावना ठेवा ॥ ध्रु० ॥ देशार्थ देहा। अर्पा स्वगेहा। देशभक्ता दैवत न दुजें; आळवा राष्ट्र-भू-देवा ! ॥ १ ॥ माता उपाशीं। बाळें उदासी। गृहलक्ष्मी जरि परदेशी; आली काळिमा नांवा ॥ २ ॥

++++++

पद चोविसावें

झणिं धांवा हृदया तोषवा। शिवनेरीच्या सदया शिवा ॥ ध्रु०॥ नरवरा अतुल बलसागरा। शुभकरा सकल सुगुणागरा। सिंधु कीं सुखाचा बांधवा ॥ १ ॥ दुर्जना दुष्ट कळिकाळसा। सज्जना दयाळू देवसा। तव पुनः शौर्यरवि हांसवा ॥ २ ॥

++++++

पद पंचविसावें

मानुनि देवा ! ही घ्या सेवा ॥ ध्रु० ॥ जनता-जनार्दना। प्रेमनिधाना !। निर्मळ भावा। लोभहि ठेवा ॥ १ ॥ व्रत आचरितां। तप हो आतां। पायिं विसावा द्यावा देवा ! ॥ २ ॥

++++++

प्रभुपदास। भरतभूस॥ सानथोर। प्रियजनांस ॥ सकल आज। नमित दास॥ पुरवि आस। श्रीगणेश॥ किमपि न्यून। हो चुकून। सकल पूर्ण। घ्या करून। या कृपेस। जीवितास। आपणांस। विकित दास ॥१॥

35023

# स्वीकृत कार्याचा समारोप

'पैसाफंड मेळा' हा पैसाफंडाची सेवा करण्यासाठीं सुरु करतांना आम्हीं एक तपपर्यंत ही सेवा करण्याचा मनोमन संकल्प केला होता. तो संकल्प विघ्नहर्त्या श्रीगजाननाच्या कृपेनें या वर्षीं पूर्ण झाला. अर्थात् आज पैसाफंड-मेळ्याचें उद्दिष्ट कार्य तात्पुरतें तरी संपलें, हें कळविण्यास आम्हांला अत्यंत आनंद वाटतो. अर्थात् हा आनंद आम्ही मेळ्याच्या निमित्तानें शिरावर घेतलेल्या जबाबदारींतून एकदांचे सुटलों म्हणून होत नसून आम्हीं हातीं घेतलेलें कार्य यशस्वितेनें सिद्धीला गेलें म्हणून होत आहे, हें येथें विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं.

लहान मुलामुलींच्या पैसाफंड-मेळ्यानें पैसाफंडाच्या चळवळीचा महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरही चांगलाच परिचय करून दिला व विचारजागृतिदेखील चांगली केली, असें बहुजनसमाज मान्यतापूर्वक म्हणतो; तो जनताजनार्दनाचा प्रोत्साहनपर शुभाशीर्वाद असें आम्हीं समजतों. ज्या वेळीं आम्ही पैसाफंडाच्या चळवळीचा प्रसार करण्याच्या हेतूनें मेळा स्थापन केला, तेव्हां तें कार्य, उत्कट सदिच्छा, जनतेची सहानुभूति व साहाय्य आणि जनताजनार्दनाची कृपा या मग्रीच्या जोरावर पार पाडूंच पाडूं असा आत्मविश्वास आम्हांला वाटत होता; तो योग्य वेळीं कल्पनातीत सार्थ झाला असें म्हटल्यास आम्हांवर कोणी अहंतेचा आरोप करणार नाहीं अशी आशा आहे.

लोकजागृतीचें कार्य जें पैसाफंड-मेळ्यानें केलें, त्याबरोबरच आजवर एका ...या सेवेंत पैसाफंड संस्थेला शेचाळीस हजार रुपये मदत म्हणून मिळवून ... हें त्या लोकजागृतीचें एक दृश्यफळ होय. ही गोष्ट ज्याप्रमाणें मेळ्याच्या ...ाणेंच पैसाफंड संस्थेच्याही सत्कार्यप्रवणतेची अल्प साक्ष देण्याला पुरेशी आहे.

पण हा यशाचा वांटा पैसाफंड-मेळ्याचा एकट्याचा नाहीं. किंबहुना आम्ही ...ळ्याच्यातर्फे अत्यंत नम्रपणें व मनमोकळेपणानें असें सांगूं इच्छितों कीं, ह्या ...शस्वितेला मेळा हा निमित्तरूप असून मेळ्यांतील गोजिरवाणीं लहान लहान ...लें व विशेषतः त्या मुलांचे पालक हेच ह्या यशाचे मोठे वांटेकरी होत. कारण ...ळा लोकप्रिय झाला तो मेळ्यांत प्रत्यक्ष सेवा करणाऱ्या मुलांच्या जिवावर राहतो.

मुलांनीं तरी हें कार्य केलें तें आपापल्या पालकांच्या उदारमनस्कतेमुळेंच केलं यानंतरचे ह्या यशाचे वांटेकरी म्हणजे ज्या ज्या ठिकाणीं मेळा गेला, तेथील उदार हृदयी सज्जन, तसेंच मेळयाला वेळोवेळीं परोपरीनें आपुलकीचें साह्य करण कवि व इतर स्नेहीजन होत. मेळयाच्या हस्तें आजवर एका तपांत घडलेली से हें ह्या इतक्या जनांच्या कृपेचें फळ होय. हें ह्या सर्वांचें ऋण नुसत्या शाब्दिक आभारांनीं मुळींच फिटण्यासारखें नाहीं खास; असें असतांही शिष्टाचार म्हणून मेळयातर्फे आम्ही ह्या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहों.

चालू सालीं श्रीयुत ह. स. गोखले, रामकवी (गोग्रास) माधवराय, वगैरे कवींनीं पद्यें करून दिलीं, आणि कवि 'अनंत' यांनीं 'केवळ सत्यासाठीं' हा पद्यसंवाद व रा० स. अ. शुक्ल यांनीं 'माझा धर्म' हा गद्यपद्यात्मक संवाद लिहून दिला व रा० वा. ना. पाबळकर यांनीं पदांच्या चाली दिल्या व रामभाऊ भेंडसगांवकर व इतर मंडळींनीं जी सर्व प्रकारें मदत केली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

आतां सर्वांपाशीं अखेरचें मागणें एवढेंच कीं, मेळयाचें उद्दिष्ट कार्य जरी आज संपलें असलें, तरी आमचें जनसेवाव्रतही संपलें असें मात्र नाहीं. तें यथामति व यथाशक्ति अखंड चालू रहाणारच. त्या सेवाव्रताला यशाची जोड मिळविण्याच्या कामीं आम्हांला बहुजनसमाजाच्या नेहमींच्या कृपादृष्टीची व सहानुभूतीची आवश्यकता आहेच, व हें मागणें मागण्याचा आमचा प्रेमाचा हक्कही आहे. यापेक्षां निराळें मागणें मागावयाचें तरी काय ? आणि या मागण्याच्या कक्षेबाहेर मागणें मागावयाचें अवशिष्ट तरी काय राहिलें ?

पैसाफंड-मेळा कार्यालय,<br>
पुणें,<br>
ता. १९।८।२८.

सर्वांचे नम्र दास<br>
**कृ. म. रानडे.**<br>
**वि. र. रानडे.**

# केवळ सत्यासाठीं !

## प्रसंग पहिला

[ वर्गाची परीक्षा झाल्यावर एक दिवस **मास्तर** मुलांस पेपराचे मार्क सांगत आहेत. एकेका मुलाचें नांव घेऊन मास्तर मार्कांचा आंकडा मोठ्यानें बोलतात व पेपर मुलाच्या हातीं देतात. शेवटीं **धोंडो** या नांवाच्या मुलाचा गणिताचा पेपर हातांत घेऊन मास्तर 'धोंडो ६० मार्क' असें मोठ्यानें सांगतात. मार्क पाहून मास्तर आश्चर्यचकित होतात.]

**मास्तर**—( धोंडोच्या पेपरावरील मार्कांचा आंकडा न्याहाळीत )

**धोंडोला गणितांत मिळाले साठ मार्क हें नवल असे ॥**

( धोंडोला जवळ बोलावून त्यास )

**दगड्या, गणितीं साठ मार्क हे, तुला मिळाले सांग कसे ?।**

**धोंडो**—**आलि परीक्षा तेव्हां दीक्षा घेतलि मीं अभ्यासाची ।**
**काय सांगु ती शिक्षा मास्तर ! शेंडि बांधिली खुंटीसी ॥**
**डोकें खुपसुनि बसलों गणितीं, कठीण विषया मग केलें ।**

[ मुलें त्याच्या थापा ऐकून हंसतात.

**मास्तर**—**थापा देसी लोणकढ्या अँ ! कपट तुझें ध्यानीं आलें ।**
**कोणाची तरि कॉपी केलिस, खास यांत नाहीं शंका ।**

**धोंडो**—**खरें बोलतों कॉपि न केली,** ( एकीकडे पाहून डोळे मिचकावीत ) **कसें फसविलें या शंखा ॥**

**मास्तर**—( त्याचा कान पकडून )

**आंखुड काना लांब करोनी, लंबकर्ण तुज बनवीतों ॥**

**धोंडो**—( कांपत व बलवंताकडे बोट दाखवीत )

**शेजारीं बलवंत बैसला, साक्ष तयाची मी देतों ॥**

( डोळे वटारून बलवंताकडे पहात— )

**बलवंता तूं सत्य सांगुनी, आळ काढ माझ्यावरचा ।**
**भोळा मी बघ गरिब बापुडा, तुला लोक वदती सच्चा ॥**

[ बलवंत स्तब्ध राहतो.

**मास्तर**—( धोंडोस )

तूंच खरोखर लुच्चा असली, सच्चा हा बलवंत असे ।

**धोंडो**—( डोळे मिचकावीत )

मीही सच्चा, हाही सच्चा, सच्चांनीं जग भरलेंसे ॥

**मास्तर**—( बलवंताची पाठ थोपटीत )

बलवंता तूं सेवा करिसी, पैसाफंडाची थोर ।

स्वदेशसेवा जो जो करितो, सत्याचा तो अवतार ॥

( बलवंत कांहींच बोलत नाहीं. धोंडो त्यास दटावतो. )

**धोंडो**—( भोळेपणाचा आव आणून )

ज्या अर्थीं हा बोलत नाहीं, त्या अर्थीं मी निर्दोषी ।

**बलवंत**—नाहीं मास्तर ! यानें केली, माझी कॉपी, हा दोषी ॥

स्वयंसेवका असत्य वदणें आहे नरकाची वाट ।

यास्तव बनुनी धीट असा मी वदलों सत्यचि चोखाट ॥

( धोंडो यास )

मित्रा, मजला क्षमा करीं रे, नाइलाज झाला माझा ।

**मास्तर**—क्षमा कशाला मागसि याची चोर असे हा मुलखाचा ॥

( उग्र रूप धारण करून )

धोंडो तुजला शिक्षा देतों, क्षमा माग या सर्वांची ।

गुडघे टेंकुनि नाक घांसुनी, सकलांची करुणा याचीं ॥

[ त्याला जोरानें नाक घासावयाला लावतात व जातात.

**एक मुलगा**—( बलवंतास ) सत्याचा हा पुतळा आहे—

( धोंडोस वर उठवून तिरस्कारानें— )

—हें तर घाणीचें डबकें

**दुसरा मुलगा**—चोरी करुनी मार्क मिळवितो—

( धोंडोचें डोकें हालवीत— )

—डोकें नाहीं हें खोकें ॥

[ दोन मुलांशिवाय बाकी सर्व मुलें बलवंतास घेऊन धोंडोचा उपहास करीत निघून जातात. ]

३. ५५.१३

धोंडोचे दोघे सवंगडी—

वाइट वाटुनि घेउं नको तूं, चल जाऊं खेळायाला ।
आम्हीही नापास जाहलों, दोष देउं दुर्दैवाला ॥

धोंडो—( चिडून )

बलवंतानें मान खंडिला, सूड उगवितों मी त्याचा ।
करा तुम्ही मज साह्य थोडकें, त्याला खातों मी कच्चा ॥

[ त्यांच्या कानांत कांहीं सांगतो व दांतओंठ खात निघून जातो.

++++++

## प्रसंग दुसरा

[ बलवंताचे वडील **बाबासाहेब** वर्तमानपत्र वाचीत बसले असून मुली शाळेंतून येतात. ]

मुली—भाऊराया पास जाहला आज परीक्षा शाळेची ।
पंतोजींनीं आनंदानें केलि वहावा हो त्याची ॥

मास्तर—( प्रवेश करून )

बाबासाहेब धन्य तुम्ही हो, पोटीं आला एक हिरा ।
चतुर, शहाणा, सत्यवादिही, कीर्ति वाढविल ध्यानिं धरा ॥
लहान असुनी सेवा करितो, देशाची हें योग्य असे ।
वळण लागलें त्याला उत्तम, बनलें माझें मत ऐसें ॥

बाबा—( बलवंत येतो त्यास— )

ये ये बाळा, भेट दे मला, तोष दिलासी गुरुजींला ।
अशाच रीतीं वागुनि पुढतीं, कीर्तिमान करिं कुलशीला ॥

बलवंत—( वंदन करून )

बाबा तुमच्या आशीर्वादें नच सोडिन कधिं सन्मार्ग ।
सत्या स्मरुनी करीन सेवा, सत्यधर्म वाटे स्वर्ग ॥
जातों गुरुजी, वेळ जाहली, घेतलि मीं सेवकदीक्षा ।
लोकां विनवुनि रोज जमवितों, पैसाफंडाची भिक्षा ॥

[ जातो.

मुली—देवा अमुच्या भाऊराया, दे दीर्घायू आणि यशा ।

मास्तर—बाबासाहेब मीही जातों—

बाबा— चहा तरी घ्या थोडासा ॥

[ बाबासाहेबांची धांदल उडते. मुलींना चहा आणायला सांगतात. मास्तर नको नको म्हणत निघून जातात.]

++++++

## प्रसंग तिसरा

[ पडद्याच्या आंत बलवंत पैसाफंडाचें पद म्हणत असलेलें ऐकूं येतें. बाहेर धोंडो दोघां संवगड्यांच्या कानांत कांहीं गुप्त बेत सांगतो. तिघे बाजूला लपतात. बलवंत भिक्षा मागत येतो.]

बलवंत—पैसाफंडा साह्य करोनी उद्योगाची वृद्धि करा ।
धंदा नाहीं, दीन जाहला देश तयाला उद्धारा ॥

[ रस्त्यावरील लोक पेटींत रुपये, पैसे टाकतात व जातात. इतक्यांत धोंडोचे दोघे सवंगडी रस्त्यावर भांडत येतात व खोटी मारामारी करतात. बलवंत भांडण पाहतो व तें सोडवावयास जातो. त्याची पेटी खालीं ठेवलेली असते ती धोंडो हळूच लांबवितो व चोरपावलांनीं लपतछपत निघून जातो.]

बलवंत—( दोघांचें भांडण सोडवून—)

तंटे करितां आपसांत हें काय लागलें वेड तुम्हां ।
कलह माजले असेच देशीं, आलि असे दुर्गति आम्हां ॥

[ ते दोघे माना खालीं घालून जाऊं लागतात त्यांच्याकडे बघून हंसत—]

काय म्हणावें या मूर्खांना आपसांत तंटे करिती ।

( पेटी नाहीं असें पाहून दुःखानें—)

दुर्दैवानें वेळ साधिली, चोरानें नेली पेटी ॥
पेटी गेली, पैसे गेले, लोक मला म्हणतिल चोर ।
हाय! हाय! मी काय करूं अतां कोणिं साधिलें हें वैर ॥

[ खिन्न व कावराबावरा होऊन निघून जातो. इकडून दोन पोलीस चोरपावलांनीं पळून जाणाऱ्या धोंडोस संशयावरून पकडून आणतात.]

पहिला पोलीस—चोरपावलीं कां जातोसी,
भयभीत असा कां दिससी ।

दुसरा पोलीस—पेटि कुणाची चोरलीस ही,
सांग खरें तें आम्हांसी ॥

**धोंडो**—( हात जोडून )

मारुं नका हो, भेदरलों मी, घाम दरदरां सुटलासे।
जीभ वांकडी पडली पाहें, डोळ्यांना कांहीं न दिसे ॥

[ वेडींवांकडीं तोंडें करीत व डोळे पांढरे पाडीत गळून पडतो. पोलीस त्याची उचलबांगडी करतात.]

++++++

## प्रसंग चवथा

[ बलवंतानें बाबासाहेबांचे पाय धरले आहेत.]

**बलवंत**—बाबा कथितों सत्य तेंच मी, पेटी नेली चोरानें।
फंडाची तर केलि पाहिजे, भरपाई मज पैशानें ॥
रुपये जमले बारा तेरा, तितुके द्या आतां मजला।
जाउनि पैसाफंड-कचेरिंत, भरतों राखा अब्रूला ॥

**बाबा**—( रागानें )

तुझी कहाणी खरी न वाटे, गेलासी शेफारोनी।
चतुर शहाणा सत्यवादिही, तुज खोटें स्तविलें गुरुनीं ॥
टिफिन देउनी मित्रांलागीं उडविलेसि पैसे खास।
गल्लोगल्लीं झालिं हटेलें, चटक लागली जिभलीस ॥
पैसे चोरुनि पोरें आतां उघड जाति हॉटेलांत।
दहीं-वडे, भजि, चिवडे खाती, नव्हती पूर्वि अशी रीत ॥
बसुनी पोरें हॉटेलांतुनि, पुसति गरम तें काय असे।
उसळी खाती, मिसळी खाती, पोरें वागति आज असें ॥
तोंड दाखवूं नको मला तूं, फंडाची केलिस चोरी।
फंडगुंड हा पोर निघाला, पदरीं आली लाचारी ॥

[ त्याला घालवून देऊं लागतात, इतक्यांत भावंडें येऊन बाबा-साहेबांचे पाय धरतात.]

**मुली**—बाबा, ऐसे निष्ठुर कैसे, होउनि भाऊला छळितां।

**बाबा**—चोर भामटा तुमचा भाऊ दया येइना मम चित्ता ॥

[ इतक्यांत **मास्तर** येतात. पाठीमागून **शिपाई धोंडोला** व त्याच्या **सवंगड्यांना** पकडून आणतात.]

**मास्तर**—( बलवंतास परत आणून—)

**बाबासाहेब चुकतां तुम्ही, सुळीं देतसां संन्यासी ।**
**चोर खरा तो धोंडो आहे, सामिल हे दोघे त्यासी ॥**
**पोलिसांनीं पाळत ठेवुनि, पकडुनि माझ्याप्रति अणिलें ।**
**धोंडोनें हा सूड उगविला, सर्व कांहिं ध्यानीं आलें ॥**

[ मास्तर बाबासाहेबांच्या कानांत हातवारे करून सर्व हकीगत सांगतात व त्यांची समजूत पाडतात.]

**बाबा**—( बलवंताला जवळ घेऊन—)

**बलवंता, तुज व्यर्थ निंदिलें निर्दोषी तूं आहेसी ।**

**धोंडो**—( पेटी पुढें ठेवून पायां पडतो.)

**नीच खरा मी दोषी आहें, क्षमा करा या मूढासी ॥**

**दोघे सवंगडी**—( पायां पडून—)

**गरम भजांच्या, शेवगांठिच्या नादानें फसलों होतों ।**
**जीभ चावुनी क्षमा मागतों, तोंडांतहि मारुन घेतों ॥**

**बलवंत—गुरुजी सोडुनि द्या मित्रांना, यांना पस्तावा झाला ।**
**क्षमा केलि मीं आनंदानें, धोंडो वाटे मित्र मला ॥**

( धोंडोला भेटून व त्याच्या हातीं पेटी देऊन—)

**करिं सेवा पैसाफंडाची, शुद्ध बुद्धि उपजेल तुला ।**
**सत्यव्रत घे आजपासुनी, भारतमाता जय बोला ॥**
**निःस्वार्थ मनें सेवा करितां निर्मळ पैसाफंडाची ।**
**सत्याचरणा जोर येतसे, गोष्ट माझि स्वानुभवाची ॥**

**सर्व—धन्य आमुचा बलवंत असे, धन्यहि पैसाफंड असे ॥**
**द्रव्य देणगी देउनि त्याला साधा देशहिता खासें ॥**

[ पोलीस, मास्तर, बाबासाहेब, सर्व धोंडोच्या हातांतील पेटींत पैसे टाकतात. तो सर्वांना वंदन करतो.]

**मुलें—हा हा हा हा ! गंमत झाली अहो उडाली नवी मजा ।**
**सत्य बाणतें जनसेवेनें आला अनुभव अजि ताजा ॥**

**समाप्त**

# माझा धर्म

## प्रसंग पहिला

[स्थळ—धनवंतरावांचें घर.]

[ **मालती, शेवंती, बबन, बबी** वगैरे मुलेंमुली ईशस्तवन म्हणत आहेत. ]

**भुलत प्रभो ! मन-मधुकर रमला । तव पद-**
**कमला । परम सुविमला ॥ ध्रु०॥ जनता दीना संभ्रम**
**विकला । ज्ञानकला जागवि सकलां ॥ १ ॥**

**शेवंती**—पुरें झालं बाई हें ईशस्तवन ! मालती, किती तरी दिवसांनीं तूं आमच्या घरीं आलीस. तुझा गळा गोड म्हणून तुला एखादं गाणं म्हणायला सांगितलं. तूं तर ही ईशस्तुतिपर रडगाण्याची पिरपीर सुरू केलीस. नाटकाला जशी सुरवातीला नांदी तसं तुझं गाणं म्हणजे आपलं ईशस्तवन ! डॅम धिस् ! नॉन्सेन्स ! मालती, दुसरं एखादं सुंदर पद म्हण पाहूं.

**बबन**—मालतीताई, तुम्हांला नाटकांतलीं पदं येत नाहींत वाटतं ? आमची शेवंती अक्का पहा—नाटकांतलं संगीत हिचा अगदीं गळा धरून बसलं आहे. अक्का, “ आतां राग देई मना—” म्हण पाहूं तूं.

**शेवंती**—बबन, मला आतां राग यायला लागला आहे तुझा. गप्प बैस.

**बबन**—म्हणा-“ कधिं करती लग्न माझें—”

**शेवंती**—चुप्. वात्रट कुठला. मालती, म्हणेसना पद ?

**मालती**—मला नाहीं बाई येत नाटकांतलं पद म्हणायला. तुला ठाऊकच आहेना, पूर्वीं मीं पुण्याच्या पैसाफंड-मेळ्यांत होतें, तिथं देशस्थितीचीं न् देश-भक्तीचीं पदं मी गायला शिकलें—तेवढींच मला येतात. मी कांहीं कधीं तुझ्या-सारखीं नाटकं बघत नाहीं.

**बबन**—काय ? तुम्ही कधीं नाटकं पहात नाहीं ? म्हणतां काय ? फुकट, जन्म फुकट ! तुम्ही आतां दोघीही स्वस्थ बसा. मला आतां गाण्याच्या भावना होऊं लागल्या आहेत ! बोल, कोणचा राग छेडूं ? कोणतीं तानांचीं भेंडोळीं सोडूं ? कोणत्या रागांतलं पद—ब्रह्मताल, झपताल, केरवा, त्रिताल—

**मालती**—वेड्या, हीं तालांचीं नांवं ! असा उगाच ताळ सोडून भलतंच बरळूं नकोस बेताल !

**बबन**—मी आतां ध्रुपद—धमार गातों. बागेश्रीच्या ठेक्यांत सुंदरसा मंजुळ झपताल छेडतों. कीं एखादी गजल, कवाली, ठुमरी—

**मालती**—मास्तरांजवळ असलींच गाणीं शिकतोस वाटतं ?

**बबन**—आमचे वस्ताद म्हणजे गायनशास्त्राला वस्ताद गुरुच भेटले आहेत ! ते गायला लागले म्हणजे तालसूर, पळतात बारा कोस दूर ! हां—मालती, सूर धर; पांढरी पांच—

**शेवंती**—तुझा तबला आहे का त्या सुराला जमलेला—

**बबन**—तुझा पेटीच्या सुराला माझा तबला जमला नाहीं तर माझ्या तबल्याबरोबर तुझ्या पेटीचा सूर लाव. चलाव—"आनंदकंद ऐसा—हा हिंददेश माझा"—

**शेवंती**—ओ यू हिंद देश ! उगाच काय जनावरासारखा आ करून आरडतोस ?

**बबन**—आ करून आरडूं नको तर काय गाण्याच्या नांवानं नुसताच रडूं म्हणतेस ? पुरें झालं गाणं—आतां चला, कोरसच म्हणूं—"गॉड सेव्ह् धी किंग् ! गॉड सेव्ह् आवर प्रेशस् किंग्—लाँग लिव्ह् आवर नोबल्—गॉड सेव्ह् धी किंग् !"

[ एकच गोंधळ—आरडाओरड करतात.

**बाबूराव**—( प्रवेशून रागानें ) हो—हो—हो—अरे—अरे—अरे, कायरे हें ? बँडचा स्टँड घरींच आला कीं काय ? चला उठा, काय मांडलं आहे हें ?

**बबन**—दादा, हें गायनवादन चाललं आहे !

**बाबूराव**—कसलं कपाळाचं गायनवादन ! हंबक् ! गायन नव्हे—तुम्ही तर नुसतंच तोंडानं—जोराचं वादन चालवलं आहे, चला. न्या तो पेटी-तबला ! शंख जमले आहेत सारे ! [ पेटी तबला नेऊन ठेवतात.

**शेवंती**—तुझीही भर याच शंखांत पडली !

**मालती**—शेवंती, पण बाबूरावांचं एवढं काय वाचन चाललं आहे ?

**बाबूराव**—घर आहे कीं बाजार-मंडई ! एवढं मोठं राजवाड्यासारखं घर, पण निवांत जागा अशी नाहीं कुठं वाचत बसायला. माडीवरच्या दिवाणखान्यांत बसलों; पण तिथं त्या चिमुकल्या छबीनं पाळण्यांत तसा आरडाओरडीचा जलसा आरंभलेला ! इथं आलों तर तुमचा हा असा जलसा-गायनवादनाचा जंगी जाहीर जलसा ! शेवंती, या बबन-बबीला सांथीला घेऊन एखादा मेळा काढणार आहेस कीं काय ? वा ! छान् साथ जमली आहे या दोघांची ! या साथीपुढं इन्फल्यूएंझाची सांथ सुद्धां रद्द आहे !

**शेवंती**—पण दादा, एवढा काय वाचनांत गढून गेला आहेस ? परीक्षेच्या दिवसांत देखील तुझ्या हातांत मीं कधीं पुस्तक पाहिलं नाहीं--

**बबन**—पण आतां पहा. आमचा दादा म्हणजे एक फिरतं वाचनालय झाला आहे. चालती बोलती लायब्ररी ! पुस्तकं तरी पाहूं ! ओहो ! ( पुस्तकें काढून पाहतो. बाबूराव वाचण्यांत दंग असतो.) द्रौपदी, मेनका,स्वयंवर, विद्याहरण ! सबंध खाडिलकर खिशांत घातले आहेत ! बगलेंत रणदुंदुभी, महत्त्वाकांक्षा ! वीर वामनरावांना खाकोटीला मारलं आहे. हाच मुलाचा बाप, सत्तेचे गुलाम ! भले शाबास ! वरेरकरांना तर पाठकुळीलाच घेतलं आहे ! आणि हातांत काय ? एकच प्याला ! शाबास बाबूराव ! प्रेमसंन्यास-राजसंन्यास-वेड्यांचा बाजार !—

**मालती**—खरोखरीच सारा वेड्यांचा बाजार !

**शेवंती**—गडकऱ्यांना हाताशीं धरलं आहे. पण छातीवर काय ? शिका-कट्यार ! दादा-तूं म्हणजे एक थिएटरांतला छोटासा बुकस्टॉलच झाला आहेस ! झाडून साऱ्या नाटकं-कादंबऱ्यांचीं पारायणं चालविलीं आहेस वाटतं ? नाटकांचा एवढा नाद—

**बाबूराव**—(एकीकडे) नॉन्सेन्स ! एवढा मोठा नाटककार ! पण या नाटकांत हे गडकरी पदवीधरांची निंदा करतात ! पदवीची नाचक्की तळीरामासारख्या दारुड्याच्या तोंडीं ! कोण सहन करणार ? दारुबाज पदवीधरसुद्धां हा आपल्या पदवीचा अपमान सहन करूं शकणार नाहींत. समजलं. गडकऱ्यांना स्वतःला पदवीधर होतां आलं नाहीं-त्यांना पदवी मिळाली नाहीं-म्हणूनच पदवीचं शेंपूट असलेल्या साऱ्या नंदीबैलांवर ते उखडले आहेत. (जोरानें ओरडून) पदवी-पदवी-पदवी ! डिग्री-डिग्री !

**विद्याधर**—अरे, बाबूराव, असा काय बरळतोस ? डिग्री ! ताप चढला आहे कीं काय ? किती डिग्री !

**बाबूराव**—वेल् माय् फ्रेंड ! केव्हां आलास ?

**विद्याधर**—तूं डिग्रीच्या नांवानं ओरडत होतास तेव्हां.

**बाबूराव**—डिग्रीच्या नांवानं तर आज सात वर्षं मी ओरडतों आहें. सात वर्षं बी. ए.ला बसतों आहें. तुला ठाऊकच आहे. या बी. ए.ला बसण्याऐवजीं कौन्सिलसाठीं उभा राहिलों असतों तर या सात वर्षांत एकदां तरी—

**विद्याधर**—पण जाऊंदे-यंदांचे पेपर्स कसे काय गेले आहेत ?

**बाबूराव**—कसे म्हणजे ? जायचे तसेच नेहमींप्रमाणं गेले आहेत ! पेपर्स जाऊं देत कसेही ! परीक्षेची तयारी नव्हे-गेलेले पेपर्स नव्हे तर माझ्या राशीला आलेले यंदांचे शुभग्रहच सांगताहेत कीं मी पास होणार ! मी संपूर्णपणें सहीसलामत उत्तीर्ण होणार परीक्षेंत ! काय सांगावं महाराजा, ग्रह बोलताहेत ! प्रोफेसर रमलज्ञ भानूंनीं हेंच ज्योतिष वर्तविलें ! पंडित रघुनाथशास्त्र्यांनीं हेंच भविष्य वर्तविलं ! परवां एका रस्त्यावरच्या कुडबुड्या जोशीबुवाला हात दाखविला—

**विद्याधर**—भले ! त्या बिचाऱ्याला हात दाखविलास ?

**शेवंती**—हात दाखवून अवलक्षण करून घेतलंस ?

**बाबूराव**—हा तुझा दादा सुलक्षणी आहे-अवलक्षणी नव्हे. केवळ ज्योतिष-शास्त्रांतले ग्रहच आग्रहानं बजावून सांगताहेत म्हणून मीही तुला ठांसून सांगतों कीं मी यंदां पास होणार-पदवीधर होणार-ग्रॅज्युएट होणार-बी. ए. होणार ! ही पहा माझी बॅग !

**विद्याधर**—हें काय ? बाबूराव-बी. ए. अपॉन् ट्र ? म्हणजे !

**बाबूराव**—अर्धा बी. ए. अंडर ग्रॅज्युएट ! आतां पूर्ण ग्रॅज्युएट होणार ! पुरता बी. ए. होणार. अर्धवट बी. ए. नाहीं !

**शेवंती**—अर्धवटच ! बी. ए. झाला तरी अर्धवटच !

**बाबूराव**—मीच काय पण कितीतरी वडे बडे पदवीधर अर्धवटच असतात !

**धनवंतराव**—(प्रवेशून) शाबास, आज हा पोर उभ्या आयुष्यांत खरं बोलला !

**बाबूराव**—(स्वगत) म्हणजे ? मी उभा जन्म खोटं बोलण्यांत घालविला

असंच बाबांना वाटतं कीं काय ? चला अगोदर. हा ड्रेस उतरून आलं पाहिजे. (विद्याधरास) विद्याधर, हा आलोंच.

**विद्याधर**—पण हा अवतार कुठला ?

**बाबूराव**—हा रंगेल रसिकरायाचा आधुनिक नाटकी अवतार आहे ! कोणतंही नाटक–कादंबरीचं पुस्तकं शोधायचा त्रास पडूं नये म्हणून ही स्पेशल सोय केली आहे. [ जातो.

**धनवंतराव**—वा ! विद्याधर, मालती, शेवंती, सारेजण तुम्ही इथंच ? आणि बाबू कुठं गेला ?

**शेवंती**—नाटकं–कादंबऱ्यांचीं पारायणं करण्यांत गढून गेला आहे.

**धनवंतराव**—विद्याधर, तुझ्या परीक्षेचा रिझल्ट.

**विद्याधर**—आजच–बारा वाजतां–तिकडच निघालों आहें. पहावें आमचेच बारा वाजतात कीं काय तें—

**धनवंतराव**—कांहीं तरी बोलतोस ! तुझ्यासारखा हुषार, मेहनती विद्यार्थी–

**विद्याधर**—नापास व्हायचा–काय नेम ! युनिव्हर्सिटीची परीक्षा म्हणजे एक लॉटरी आहे.

**शेवंती**—खरं आहे. किती तरी शंखोबा पास होतात आणि हुषार स्कॉलर्स नापास होतात.

**धनवंतराव**—शेवंती, कांहींतरी बोलतेस. असं कधीं झालंय् ? बाकी मला कांहीं अनुभव नाहीं. मी कुणी पदवीधर नाहीं. मी आहें धंदेवाला माणूस ! बाबूनं सुद्धां कॉलेजांत जाऊन पदव्यांच्या नादीं लागण्यापेक्षां धंदेशिक्षण घ्यावं असं माझं पहिल्यापासून त्याला सांगणं होतं; पण उगाच वाऱ्या करीत बसला आहे बी. ए.च्या.

**विद्याधर**—यंदां तो पास होणार आहे.

**धनवंतराव**—कशावरून ? एखादं कर्णपिशाच भेटलं कीं काय ?

**विद्याधर**—ज्योतिष्यांनीं सांगितलं आहे.

**धनवंतराव**—कसलं ज्योतिष ! सारं थोतांड ! हा दुबळा दैववाद—

**विद्याधर**—आपल्यासारख्या कर्तबगार प्रयत्नवादी कर्मवीराला न पटावा हें रास्तच आहे.

**धनवंतराव**—मनुष्य स्वतःच्या नशिबाचा कारागीर आहे. विद्याधर यःकश्चित् फेरीवाल्याचा धंदा प्रारंभीं करून—

**विद्याधर**—केवळ दीर्घोद्योगाच्या जोरावर आपण आज रंकाचे राव—भिक्षाधीशाचे लक्षाधीश—झालां आहांत, हें सारं समंजस जग आज कबूल करीत आहे. उद्योगधंदा हाच आजच्या युगाचा खरा परमेश्वर आहे. केवळ बाबांची इच्छा म्हणूनच मी या बी. ए.च्या भरीला पडलों आहें. नाहींतर माझ्या मनाचा कल प्रथमपासून व्यापारधंद्याकडेच आहे.

**धनवंतराव**—मी जाणून आहें; परंतु तुझे वडील—रावसाहेब पडले बडे पदवीधर! त्यांना आपला मुलगाही बडा पदवीधर—सरकारी ऑफिसर व्हावा असं वाटणं साहजिक आहे. केवळ वडिलांची इच्छा म्हणून तूं या पदवीच्या पाठीं लागला आहेस.

**शेवंती**—आणि केवळ स्वतःची इच्छा म्हणून आमचा दादा बाबांची मर्जी मोडून पदवीचं शेंपूट चिकटवून घेऊं पहात आहे!

**धनवंतराव**—मौज आहे झालें!

**बाबूराव**—( प्रवेशून ) मौज! जुनी कीं नवी! नवी मौजच दिसते ही! बाबा, मी आज पास झालों.

**धनवंतराव**—तरी मला त्याचं सुखदुःख सारखंच आहे.

**बाबूराव**—आश्चर्य आहे! ठीक आहे! एकदां बी. ए. तर होऊंदे. सारं जग मी माझ्या पायांशीं झुलवीन.

**धनवंतराव**—काय पोरट्याला एव्हांपासूनच घमेंड चढली आहे.

**विद्याधर**—ही घमेंड—कीं आत्मविश्वास!

**धनवंतराव**—ही घमेंड—आत्मविश्वास नव्हे! समंजस आत्मविश्वास बडबड्या नसतो. आचरट घमेंडीची कोरडी खळखळ फार असते. जाऊंदे भविष्याच्या झांकल्या मुठींत काय आहे—

**विद्याधर**—आजच—आतां कळेल.

**बाबूराव**—घोडा-मदान जवळच आहे. विद्याधर, चल—राजाबाई टॉवरवर! एकदां बी. ए. तर होतों. मग सांगतों कुणाला काय सांगायचं तें!

**धनवंतराव**—आज सात वर्षं सांगतोच आहेस! शेवंतीनें इंग्रजी शाळेंत पहिलं

३६२३


पाऊल टाकलं त्याच वर्षी तूं बी. ए.ला बसून परीक्षेच्या मांडवांत पहिलं पाऊल टाकलंस ! ही मॅट्रिक झाली तरी तूं बी. ए. होतोच आहेस !

**शेवंती**—आम्ही दोघेंही आतां एकदमच बी. ए. होऊं.

**बाबूराव**—बरं. बरं. चोंबडेपणा करूं नको.

**शेवंती**—चार पेपर जेवणाचे न बाकीचे पेपर झोंपायचे ! असा कार्यक्रम युनिव्हर्सिटी परीक्षेला ठेवील तेव्हांच आमचा दादा बी. ए. झाला तर कदाचित् होईल !

**बाबूराव**—शेवंती–बाबा–ही माझी नव्हे तर युनिव्हर्सिटीची–डिग्रीची–हिंदुस्थानसरकारच्या उच्च शिक्षणपद्धतीची तुम्हीं थट्टा आरंभिली आहे. ऑलराईट ! युनिव्हर्सिटी देवते ! मला यश दे ! विद्याधर–चल–साडेदहा झाले. क्विक् मार्च.

[ त्याला घेऊन जातो.

**धनवंतराव**—हा आमचा दिवटा बी. ए. होऊन काय दिवे लावणार देव जाणे ! मालती, तुझ्या भावाचं–विद्याधराचं सौजन्य कुठं आणि शेवंती, हा तुझा भाऊ ! बाबूची बडेजावी कुणीकडे ! [ जातो.

**शेवंती**—दादा पास झाला तर त्याला स्वर्ग दोन बोटंच उरेल !

**मालती**—आणि विद्याधर भाऊ आज दुर्दैवानं नापास झाला तर बाबा त्याला स्वर्गांत पाठवावयालाच तयार होतील.

**शेवंती**—इश्श. कांहींतरीच बोलतेस.

**मालती**—अग, खोटं नव्हे. काय काय होईल तें दिसेलच तुला.

**शेवंती**—बरं, बैस आतां जरा. इथंच जेव झालं.

**मालती**—जेवण आटोपलं आहे केव्हांच. बाबांना दहा वाजतांच जेवून ओल्या हातांनीं ऑफिसांत पळावं लागतं ना ? पण काय ग शेवंती, तूं आतां कॉलेजांत कोणत्या जाणार ?

**शेवंती**—बाबा कुठं तयार आहेत मला कॉलेजांत पाठवायला. झालं हें शिक्षण पुष्कळ झालं असंच त्यांचं मत आहे. मला पुष्कळ वाटतं कीं कॉलेजांत जावं—बी. ए., एम्. ए. व्हावं; पण—

**मालती**—काय ग करायचं आहे मुलींनीं कॉलेजांत जाऊन ? तुझे बाबा म्हणतात तेंच खरं आहे !

**शेवंती**—म्हणजे ? बाबांच्याप्रमाणं तुझींही मतं स्त्री-शिक्षणाच्या बाबतींत

**धनवंतराव**—मनुष्य स्वतःच्या नशिबाचा कारागीर आहे. विद्याधर यःकश्चित् फेरीवाल्याचा धंदा प्रारंभीं करून—

**विद्याधर**—केवळ दीर्वोद्योगाच्या जोरावर आपण आज रंकाचे राव—भिक्षाधीशाचे लक्षाधीश—झालां आहांत, हें सारं समंजस जग आज कबूल करीत आहे. उद्योगधंदा हाच आजच्या युगाचा खरा परमेश्वर आहे. केवल बाबांची इच्छा म्हणूनच मी या बी. ए.च्या भरीला पडलों आहें. नाहींतर माझ्या मनाचा कल प्रथमपासून व्यापारधंद्याकडेच आहे.

**धनवंतराव**—मी जाणून आहें; परंतु तुझे वडील—रावसाहेब पडले बडे पदवीधर! त्यांना आपला मुलगाही बडा पदवीधर—सरकारी ऑफिसर व्हावा असं वाटणं साहजिक आहे. केवळ वडिलांची इच्छा म्हणून तूं या पदवीच्या पाठीं लागला आहेस.

**शेवंती**—आणि केवळ स्वतःची इच्छा म्हणून आमचा दादा बाबांची मर्जी मोडून पदवीचं शेंपूट चिकटवून घेऊं पहात आहे!

**धनवंतराव**—मौज आहे झालें!

**बाबूराव**—( प्रवेशून ) मौज! जुनी कीं नवी! नवी मौजच दिसते ही! बाबा, मी आज पास झालों.

**धनवंतराव**—तरी मला त्याचं सुखदुःख सारखंच आहे.

**बाबूराव**—आश्चर्य आहे! ठीक आहे! एकदां बी. ए. तर होऊंदे. सारं जग मी माझ्या पायांशीं झुलवीन.

**धनवंतराव**—काय पोरट्याला एव्हांपासूनच घमेंड चढली आहे.

**विद्याधर**—ही घमेंड—कीं आत्मविश्वास!

**धनवंतराव**—ही घमेंड—आत्मविश्वास नव्हे! समंजस आत्मविश्वास बडबड्या नसतो. आचरट घमेंडीची कोरडी खळखळ फार असते. जाऊंदे भविष्याच्या झांकल्या मुठींत काय आहे—

**विद्याधर**—आजच—आतां कळेल.

**बाबूराव**—घोडा-मैदान जवळच आहे. विद्याधर, चल—राजाबाई टॉवरवर! एकदां बी. ए. तर होतों. मग सांगतों कुणाला काय सांगायचं तें!

**धनवंतराव**—आज सात वर्षे सांगतोच आहेस! शेवंतीनें इंग्रजी शाळेंत पहिलं

3623


पाऊल टाकलं त्याच वर्षी तूं बी. ए.ला बसून परीक्षेच्या मांडवांत पहिलं पाऊल टाकलंस ! ही मॅट्रिक झाली तरी तूं बी. ए. होतोच आहेस !

**शेवंती**—आम्ही दोघेंही आतां एकदमच बी. ए. होऊं.

**बाबूराव**—बरं. बरं. चोंबडेपणा करूं नको.

**शेवंती**—चार पेपर जेवणाचे न बाकीचे पेपर झोंपायचे ! असा कार्यक्रम युनिव्हर्सिटी परीक्षेला ठेवील तेव्हांच आमचा दादा बी. ए. झाला तर कदाचित् होईल !

**बाबूराव**—शेवंती–बाबा–ही माझी नव्हे तर युनिव्हर्सिटीची–डिग्रीची–हिंदुस्थानसरकारच्या उच्च शिक्षणपद्धतीची तुम्हीं थट्टा आरंभिली आहे. ऑलराईट ! युनिव्हर्सिटी देवते ! मला यश दे ! विद्याधर–चल–साडेदहा झाले. क्विक् मार्च.

[ त्याला घेऊन जातो.

**धनवंतराव**—हा आमचा दिवटा बी. ए. होऊन काय दिवे लावणार देव जाणे ! मालती, तुझ्या भावाचं–विद्याधराचं सौजन्य कुठं आणि शेवंती, हा तुझा भाऊ ! बाबूची बडेजावी कुणीकडे !

[ जातो.

**शेवंती**—दादा पास झाला तर त्याला स्वर्ग दोन बोटंच उरेल !

**मालती**—आणि विद्याधर भाऊ आज दुर्दैवानं नापास झाला तर बाबा त्याला स्वर्गांत पाठवावयालाच तयार होतील.

**शेवंती**—इश्श. कांहींतरीच बोलतेस.

**मालती**—अग, खोटं नव्हे. काय काय होईल तें दिसेलच तुला.

**शेवंती**—बरं, बैस आतां जरा. इथंच जेव झालं.

**मालती**—जेवण आटोपलं आहे केव्हांच. बाबांना दहा वाजतांच जेवून ओल्या हातांनीं ऑफिसांत पळावं लागतं ना ? पण काय ग शेवंती, तूं आतां कॉलेजांत कोणत्या जाणार ?

**शेवंती**—बाबा कुठं तयार आहेत मला कॉलेजांत पाठवायला. झालं हें शिक्षण पुष्कळ झालं असंच त्यांचं मत आहे. मला पुष्कळ वाटतं कीं कॉलेजांत जावं—बी. ए., एम्. ए. व्हावं; पण—

**मालती**—काय ग करायचं आहे मुलींनीं कॉलेजांत जाऊन ? तुझे बाबा म्हणतात तेंच खरं आहे !

**शेवंती**—म्हणजे ? बाबांच्याप्रमाणं तुझींही मतं स्त्री-शिक्षणाच्या बाबतींत

सोंवळीं–मवाळ दिसतात. विलायतेंत पहा. पुरुषांच्या बरोबरीनं शिकून पुरुषांचे सारे धंदे बायकांनीं उचलले आहेत !

**मालती**—पण हें हिंदुस्थान आहे. विलायत नव्हे. मी स्त्री-शिक्षणाच्या विरुद्ध नाहीं. बायकांना अवश्य शिक्षण पाहिजे पण तें असं कॉलेजांतलं पुरुषी शिक्षण नको. बुद्धीचा विकास करुन स्त्रियांना ज्ञानी, चतुर, सुशील बनवील तेंच खरं स्त्री-शिक्षण, पाकशास्त्र, शिशुसंगोपन—

**शेवंतीः**—पुरें हें तुझं प्रवचन ! हें असलं गृहकृत्यांचं शिक्षण घ्यायला मुलींना शाळेंतच कशाला पाठवायला पाहिजे ? संसाराच्या शाळेंत पाय ठेवला कीं आपोआपच हे गृहिणीधर्माचे व्यवहारी धडे त्यांना मिळतात.

**मालती**—व्यवहारापुरतं इंग्रजी मराठी उत्तम लिहितांवाचतां येणं—पत्नीपदाची–मातृपदाची–जबाबदारी ओळखणं—

**शेवंती**—पण हें एवढं तुटपुंजं शिक्षण कुणाला पुरेंसं होईल ? आतां लग्न करून संसार थाटायचा आहे त्या मुलींना—

**मालती**—म्हणजे ? तूं कुमारिकाच जन्मभर राहणार आहेस कीं काय ?

**शेवंती**—भलतंच बोलूं नकोस. कॉलेजांत न जातां बायकांनीं अर्धवट शिक्षण घेण्यापेक्षां मुळींच शिक्षण न घेतां अर्धवटच राहिलेलं फार बरं—

**मालती**—म्हणजे–खाईन तर तुपाशीं–नाहीं तर उपाशी ! कॉलेजांत जाऊन पुरुषांच्या बरोबरीनं मिसळून उच्च शिक्षणच घ्यायचं तर—

**शेवंती**—काय करावं ?

**मालती**—महर्षि कर्व्यांच्या महिलाविद्यापीठांत जाऊन तरी पदवीधर। विदुषी होण्याची हौस फेडून घ्यावी—

**शेवंती**—तुझे हे आजीबाईचे विचार मला पटत नाहींत. स्त्रियांनीं कॉलेजांत जाऊनच पदवी मिळविली पाहिजे.

**हें कालचक्र धावें। कधिंना विराम पावें॥ ध्रु०॥**
**स्वातंत्र्य स्वैर भावें। लोकीं सदा रमावें ॥ १ ॥ स्त्रीनें**
**न दास व्हावें। पुरुषांपुढें नमावें ॥ २ ॥**

**बाबूराव**—( प्रवेशून ) पदवी ! पदवी ! ! पदवी ! ! ! स्त्रियांना पदवी पाहिजे कशाला ? पुरुषांच्या डोक्यावर चढून मिरें वाटायला—नाहीं. कालत्रयीं नाहीं–पदवीधर होण्याचा हक्क–जन्मसिद्ध हक्क फक्त आम्हां पुरुषांनाच आहे—

फार काय–शिक्षण घेण्याचा हक्क फक्त पुरुषांनाच–बायकांनीं चुलीपुरतं शिक्षण घ्यावं–माजघराची मर्यादा त्यांनीं ओलांडली तर त्यांत पुरुषजातीची अमर्यादा होण्याचा संभव असतो—

**शेवंती**—कोण ? दादा ?

**बाबूराव**—होय. तोच मी तुझा दादा ! पदवीधर दादा ! बी. ए. झालेला बाबूराव—

**शेवंती**—खरंच ! रिझल्ट लागला ? तूं पास झालास ?

**बाबूराव**—पास झालों–बी. ए. झालों–पदवीधर झालों–आज मला मोक्ष मिळाला–युनिव्हर्सिटीच्या उंबरठ्यावर सात वर्षं कपाळमोक्ष करून घेतां घेतां आज मला मोक्ष मिळाला ! मीं त्रिभुवन जिंकलं !—सारं जग आज माझ्या विद्वत्तेपुढं वांकलं ! जणुं काय आज मीं स्वर्गांतच पाऊल टाकलं ! शेवंती, बाबा कुठं आहेत ? आई कुठं आहे ? माझं अभिनंदन करा–शंभर रुपयांचे पेढे आणा–हारतुरे आणा–या विजयी वीरावरून पंचारती ओवाळा—

**शेवंती**—ते असो–तूं पास झालास–आनंद झाला—

**मालती**—पण विद्याधर भाऊ—

**शेवंती**—वा ! तें तर फर्स्टक्लासांत आले असतील.

**बाबूराव**—फर्स्टक्लास ! बिचाऱ्याच्या दुर्दैवांत थर्डक्लाससुद्धां नाहीं. फोर्थक्लास !

**मालती**—म्हणजे ? भाऊ नापास झाला ?

**बाबूराव**—आश्चर्य काय त्यांत ? युनिव्हर्सिटीची परीक्षा म्हणजे डर्बी लॉटरी आहे–जुगार आहे–नशिबाचा खेळ आहे. शर्यतीचं मैदान आहे. विद्याधर उत्तम स्कॉलर पण दुर्दैवानं नापास झाला आणि अस्मादिक कल्पना नसतांही अचानक पास झाले ! परीक्षेच्या चाळणींतून हें गाळीव रत्न अचूक बाहेर पडलं.

**मालती**—शेवंती, मी जातें घरीं–भाऊला आज तर डोक्यावर ब्रह्मांड कोसळल्यासारखं झालं असेल. [जाते.

**बाबूराव**—सात वर्षं दगड मारतां मारतां आज दगड अचूक लागला आणि हा दगड देवाच्या पदवीला चढला.[**धनवंतराव** येतात.] बाबा–या–ताजी बातमी ! आनंदाची वार्ता–आज मी बी. ए. झालों.–कृतकृत्य झालों–आपला चिरंजीव पदवीधर झाला !

**धनवंतराव**—फार उत्तम झालं ! बी. ए. झालास–माझी इच्छा नव्हती तरी

बी. ए.पर्यंत शिक्षण घेण्याची तुझी हौस तूं पार पाडलीस. आतां तरी माझी इच्छा म्हणून व्यापारधंद्याचं उच्च शिक्षण घे. धंदेशिक्षण घेण्यासाठीं पाहिजे तर जपानांत जा.—अमेरिकेला जा. तुला मी विलायतेला पाठवायला तयार आहें.

**बाबूराव**—विलायत कशाला ? हिंदुस्थान हीच माझी जिवाची विलायत ! मला एम्. ए., एल्एल्. बी. व्हायचं आहे. आर्टस्सारखा सुखाचा आरामशीर कोर्स नाहीं. बाबा, आजच माझ्या नांवें शिक्षणासाठीं दहा हजार बँकेंत ठेवा. एम्.ए.च्या न् लॉच्या टर्म्स् मी एकदमच भरतों. पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत सरदारी थाटानं राहून—निदान दहापांच वर्षांत तरी—एम्. ए., एल्एल्. बी—वकील, बॅरिस्टर—कलेक्टर—न जाणो—हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरलसुद्धां होईन.

**धनवंतराव**—बाबू,तुझ्या ह्या मूर्खपणाला हंसावं कीं रडावं हेंच समजत नाहीं. भ्रमाचा भोंपळा लौकरच फुटेल. बी. ए. झालास तरी गगनाला गवसणी घालण्याची ही तुझी महत्त्वाकांक्षा मूर्खपणाची आहे. कल्पनामय वातावरणांत वावरलेला बावळ्या बुद्धीचा तूं ! व्यवहारी जगांतील जीवनकलहाची—धकाधकीच्या मामल्याची तुला कल्पना नाहीं. पदवीला विचारतो कोण ? ते दिवस गेले—सुशिक्षित पदवीधर दरवर्षी हजारांनीं युनिव्हर्सिटीच्या चरकांतून बाहेर पडत आहेत. त्या व्यवहारशून्य पुस्तकपंडितांच्या—पदवीधरांच्या बेकारीचा प्रश्न आज प्रामुख्यानं समाजापुढं आहे. हजारों बी. ए. आज अन्नाला मोताद होऊन बेकार भटकत आहेत.

**जग जिंकिलें वरिलें यशाला । अभिमान हा खोटा**
**कशाला ? ॥ध्रु०॥ व्यवहार हा झाला विशाला । जगतांत**
**या मनुजासि शाला ॥१॥ नच का दिसे निद्रावशाला ।**
**अहि घातकी बसला उशाला ॥ २ ॥**

**बाबूराव**—मी बी. ए. झालों आहें. कोरं करकरीत सर्टिफिकेट माझ्याजवळ आहे. लाथ मारीन तिथं पाणी काढीन. दोनदोनशें रुपयांच्या नोकऱ्या मला घरीं चालून येतील. कोणत्या भ्रमांत आहां—बस्स. तुमच्या मदतीची मला जरूर नाहीं. मास्तरकीची किंवा अशीच एखादी सोयीची नोकरी करून माझं शिक्षण मी पुढं चालवीन. स्वतःच्या पायावर उभा राहून एम्. ए., एल्एल्. बी. होईन. सारं जग पायावरती कुत्र्याप्रमाणं लोळवीन ! याच घडीला हा विजयी वीर उजळमाथ्यानं घराबाहेर पडत आहे. तुमचे आशीर्वादसुद्धां मला नकोत. एखादा बडा

ऑफिसर-नाहीं तर प्रोफेसर होईन-नंतरच तुम्हांला तोंड दाखवीन. कसा झालों तरी बी. ए. आहें. ग्रॅज्युएट आहें-पदवीधर आहें—

**धनवंतराव**—हा आततायीपणा करूं नकोस. फुकट पश्चात्ताप पावशील.

**बाबूराव**—बस्स. माझं ध्येय मीं आंखलं. बी. ए.च्या पदवीची दिवटी पाजळून माझा वैभवकीर्तीचा मार्ग मी जगांत काढीन! बी. ए. झाल्यावर मी खुद्द वडिलांची तरी भीडमुर्वत कशाला ठेवूं? सारी दुनिया मला तुच्छ आहे! मला तुमची पैसुद्धां नको.

**धनवंतराव**—जा-तुला दाहीदिशा मोकळ्या आहेत. तुझा तरी निरुत्साह मी कशाला करूं?

**बाबूराव**—हा ठोकला घराला रामराम!

**थोर मान देवेंद्राचा। पुण्यलाभ हा पदवीचा ॥ध्रु०॥**
**राजमार्ग झाला। कीर्तिवैभवाला। विनाकष्ट येतचि**
**हातीं स्वर्ग आज साचा॥ १ ॥**

[जातो.

**शेवंती**—दादा-दादा—

**धनवंतराव**—जाऊंदे त्याला-पदवीची बोथट तरवार घेऊन तुझा दादा जग जिंकायला चालला आहे. जाऊंदे—

---

## प्रसंग दुसरा

[ स्थळ—रस्ता. विद्याधर. ]

**विद्याधर**—अखेर निकाल लागला! या परीक्षेच्या प्रतिकूल निकालानें माझ्या आयुष्याचाच निकाल लावण्याचा प्रसंग आणला! छे. कांहीं सुचत नाहीं. दाही दिशा शून्य झाल्या आहेत. बुद्धि बधिर झाली. मन बेचैन झालें आहे! नापास हा तीनच अक्षरी शब्द पण तो ऐकतांच सारं त्रिभुवन मला आठवूं लागलं आहे.

**मालती**—(प्रवेशून) दादा-दादा. अजून तूं रस्त्यांतच रेंगाळत कां उभा राहिला आहेस? घरीं चल ना? उन्हातान्हानं करपून चेहरा किती उतरला आहे तुझा. घरीं चल.

**विद्याधर**—परीक्षेंत उतरलों नाहीं पण चेहरा उतरला. जीव करपला आहे. हें काळंठिक्कर तोंड घेऊन घरीं कसा येऊं? ताई, अपयशानं कलंकित झालेलं हें तोंड बाबांना कसं दाखवूं ?

**मालती**—कांहींतरीच. तूं नापास झालास हा काय तुझा दोष? प्रयत्न करणं आपल्या हातीं पण यश देणें ईश्वरी इच्छेवरती !

**विद्याधर**—नव्हता–नापास हा शब्द मला आजवरच्या विद्यार्थिदशेंत ठाऊक सुद्धां नव्हता–दुर्दैवानं हा निष्ठुर अनुभवाचा विषारी प्याला पाजला–माझ्या अपयशाचा डंका जगांत वाजला—

**बाबूराव**—(प्रवेशून) हॅलो ! कोण विद्याधर ! असा रडतोस का ? कपाळावर हात मारून घेऊन रडल्यानं कपाळींचा अपयशाचा कलंक थोडाच निघणार आहे. मी पास झालों या गोष्टीचें गूढ जितकं माझं मलाच पडलं आहे तितकंच गूढ तुझ्यासारखा मेहनती स्कॉलर नापास कसा झाला याचं पडलं आहे. दैवाची विचित्र करणी, दुसरं काय! या परीक्षेच्या निकालामुळं कित्येक विद्यार्थि चढतात–कित्येक पडतात–कित्येक रडतात–कढतात–कुढतात–तर कित्येक हर्षवायु होऊन–(हंसतो) माफ कर–विद्याधर, मी तुझ्या दुर्दैवाला हंसत नाहीं. तसं हंसण्याचा हा प्रसंग नव्हे हें मी जाणतों; पण हा परीक्षेच्या निकालाचा पोरखेळ पाहिला कीं मला प्रसंगाशिवाय हंसूं कोसळतं ! चल. रावसाहेब रागावतील ही शंका बाळगूं नको. मी त्यांची समजूत काढीन. हिंमत धर–हिंमत मर्दा तो मदत खुदा ! युनिव्हर्सिटी आहे. बी. ए.ची परीक्षा आहे–तेच तेच ठराविक विषय आहेत–आणि मुख्य म्हणजे आपण स्वतः जिवंत आहोंत तोंपर्यंत काळजी कसली ! तूं एकदांच नापास झालास–मी सात वेळां नापास झालों आहें. मला गुरु कर. कॉलेजबद्दल–युनिव्हर्सिट्यांबद्दल–मुंबई, मद्रास–कलकत्ता–अलाहाबाद–किती तरी युनिव्हर्सिट्या ! किती तरी कॉलेजें ! इथं नाहीं तिथं–आजना दहा वर्षांनीं–केव्हां तरी–कुठं तरी–कसा तरी तूं बी. ए. होशीलच होशील.

**विद्याधर**—आग लागो त्या बी. ए.ला ! परीक्षा–परीक्षा–दैवाची परीक्षा झाली–आतां माझ्या नशिबीं एकच परीक्षा—

**बाबूराव**—ती कोणती ?

**विद्याधर**—पोस्ट मारटेम् एक्झॅमिनेशन् !

**मालती**--म्हणजे ? भाऊ ! असा हताश कां होतोस ? चल–घरीं चल. मी घरींच निघालें होतें. तुझी रस्त्यांतच गांठ पडली. बरं झालं-- [जातात.

**बाबूराव**--(हंसत) मूर्ख शिंचा ! नापास झाला म्हणून–एरंडेल प्याल्यासारखा आंबट चेहरा करून बायकाप्रमाणं रडतो आहे. हा **मर्द** पहा–सात वर्षं लागोपाठ फेल्यूअरची विषाची गोळी पचवून पुन्हा आहे तसाच आहे–अभंग आणि अढळ ! पास एवढ्याच शब्दानं जग माझ्या उजळलेल्या विजयी मुद्रेकडे निवळलेल्या नजरेनें पाहूं लागलं आहे ! हा पदवीचा प्रभाव ! ही माझी बॅग जगाला कंठरवानं ओरडून सांगते आहे कीं मी कोण आहें ! बाबूराव बी. ए. ! चला–रावसाहेबांच्या घरचं नाटक फुकटांत पाहूं. तेवढीच जिवाची करमणूक !

[ जातो.

---

## प्रसंग तिसरा

[ स्थळ--रावसाहेबांचें घर. **रावसाहेब, विद्याधर, मालती.**]

**रावसाहेब**--नापास झालास आणि घरीं येऊन हें काळं तोंड दाखवायला तुला लाज तरी कशी वाटली नाहीं ? विद्याधर, आज माझ्या नांवलौकिकाला कालिमा आणलास– मोठेपणाला डांबर फासलंस–तूं पास झाला असतास तर–तर काय–तुझ्यापेक्षां माझा गौरव मोठा झाला असता ! असा कुलांगार कार्टा उपजतांक्षणींच कां नाहीं मेला ? माझ्या हितचिंतक स्नेह्यांनीं केवढी समारंभाची तयारी केली होती–तूं पास होणार हीच सर्वांची खात्री ! हारतुरे आणले–अभिनंदनाचा समारंभ—

**बाबूराव**—( हारतुरे घेऊन प्रवेश करतो.) अभिनंदनाचा समारंभ साजरा करण्यासाठींच हा बाबूराव बी. ए. हारतुरे घेऊन आला आहे. विद्याधर, रावसाहेब, हार्टी कॉंग्रॅच्यूलेशन्स !

**रावसाहेब**--कोण बाबुराव ! कुणाचं कसलं अभिनंदन करतां–हा कार्टा नापास झाला आहे—

**बाबूराव**—काय ? विद्याधर आणि नापास ! हरहर ! परमेश्वरा, काय ही आम्हां विद्यार्थ्यांची शोचनीय स्थिति ! विद्याधर नापास ! छेः ! खरं नाहीं वाटत.

**रावसाहेब**—तुम्हांला नाहीं ठाऊक हें ?

**बाबूराव**—मुळींच नाहीं. ठाऊक असतं तर हे हारतुरे आणून आनंदानं अभिनंदन करायला कशाला आलों असतों.

**मालती**—किती खोटं बोलतो आहे हा नीच मनुष्य !

**विद्याधर**—(स्वगत) काय मनुष्यस्वभावाचा विचित्र नमुना आहे, समजलं. यशाच्या कैफानं बेफाम होऊन हा मला अशा हेटाळणीनं हिणवीत आहे.

**बाबूराव**—अरेरे, विद्याधर नापास झाला ! त्याचं वर्ष फुकट गेलं ! जाऊंदे ! पण हा माझ्या हारतुऱ्याचा खर्च फुकट गेला याचं मला जास्त वाईट वाटतं. रावसाहेब, ह्या हारतुऱ्याचं आतां काय करूं ?

**मालती**—विजयाची माळ गळ्यांत पडली. तुमचीच मान या हाराला योग्य आहे.

**बाबूराव**—माझा मान वाढलेलाच आहे. केवळ नाइलाज म्हणून हा हार मी-

**मालती**—कुणाच्या गळ्यांत घालणार ?

**बाबूराव**—माझ्याच गळ्यांत घालून स्वतःचा गौरव करून घेणार !

**रावसाहेब**—बाबूराव !

**बाबूराव**—रावसाहेब !

**रावसाहेब**—काय सांगूं तुम्हांला ?

**बाबूराव**—जें कांहीं सांगायचं असेल तें खुशाल सांगा.

**रावसाहेब**—माझ्या अंगाची कशी लाहीलाही उडाली आहे. मला अनिवार दुःख होत आहे.

**बाबूराव**—बापाचंच आंतडं, दुःख कां होणार नाहीं. पण जाऊंदे. रावसाहेब, विद्याधर आतांपर्यंत कधींही नापास झाला नाहीं–म्हणून एकवार नापास होणं क्षम्य.

**रावसाहेब**—चुकतां आहांत तुम्ही. कधींही नाहीं आणि आतांच नापास झाला म्हणूनच तर दुप्पट दुःख होत आहे. तो नेहमीं नापास होत राहता तर आशेला जागाच नव्हती. अर्थात् निराशेचंही कारण नव्हतं.

**बाबूराव**—खरं आहे. रोज मरे त्यास कोण रडे ! पण रावसाहेब, जो चढे तो पडे ! तुमच्याप्रमाणंच विद्याधरालाही वाईट वाटत नाहीं असं कां तुम्हांला वाटतं ?

**रावसाहेब**—त्याला काय वाईट वाटणार ? तीन त्रिकाल यथेच्छ जेवून

बापाच्या पैशांवर जिवाची मुंबई करणारा पाजी पोरटा ! गळाभर खावं, डोळाभर झोंपावं, गांवभर हिंडावं, गप्पाष्टकं झोडावींत, नाटकं सिनेमा पहावेत.

**बाबूराव**—वा ! विद्याधराला कविता, लेख, नाटकं इत्यादि ललितवाङ्मयाचा फार नाद आहे. तो होतकरू कवि, लेखक, नाटककार आहे !

**रावसाहेब**—तेंच तेंच—मोठा आतां कविता-नाटकं लिहून महाराष्ट्राचा बायरन्—शेक्स्पिअर होणार आहे. ठाऊक आहे ! इतर व्यसनांप्रमाणें हें एक कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांना आजकाल नवीनच व्यसन जडत चाललं आहे. कोणत्याही विद्यार्थ्याची ट्रंक उघडावी त्यांत दोन—चार प्रेमाच्या पाणचट कवितेचे तुकडे—एखादुसरं अर्धवट लिहिलेलं गचाळ नाटक—एखाद्या कुटाळ कादंबरीचीं दहा-पांच प्रकरणं—

**बाबूराव**—काय म्हणतां ? एकंदरींत विद्याधराचं प्रकरण असं आहे म्हणतां ? हंवक् ! विद्यार्थ्यांना नाटकाचा नाद अगदीं वाईट ! रावसाहेब, नाटकाचीं पुस्तकं मीं कधीं हातांत धरलीं नाहींत—

**मालती**—(स्वगत) खरं आहे. नेहमीं खिशांतच बाळगतां आणि टेबलावर ठेवून वाचतां.

**बाबूराव**—कधीं पैसे खर्चून नाटकं—सिनेमा बघितलीं नाहींत—

**मालती**—(स्वगत) फुकटेच तुम्ही. पैसे कशाला खर्च कराल ?

**बाबूराव**—फार काय सांगावं; नाटक—कादंबरी—गोष्टी असलं चटोर वाङ्मय—मीं स्वप्नांत वाचलं नाहीं.

**मालती**—(स्वगत) जागेपणींच—झोंप न घेतां—रात्रींचीं जागरणं करून त्यांचीं पारायणं केलीं.

**बाबूराव**—विद्यार्थिधर्म बिकट ! म्हणच आहे कीं, विद्यार्थ्याचा मार्ग कांटेरी असतो. माझा धर्म मीं कडकपणें पाळला.

**रावसाहेब**—हें काय सांगायला पाहिजे तुम्हींच तोंडानं ? अहो, असा कसून अभ्यास केलांत तुम्ही, म्हणूनच परीक्षेंत यशस्वी झालांत—फिकिर नाहीं सात वर्षं नापास झालांत तरी ! त्याचंच नांव दीर्घोद्योग—चिकाटी—विद्येची अनिवार हौस—

**बाबूराव**—(स्वगत) धन्य—धन्य ! अजब दुनिये, तुझा न्याय आंधळा आहे.

यश मिळाल्याबरोबर कितीतरी सद्गुण माझ्या अंगीं चिकटले हे ! दीर्घोद्योग-चिकाटी-ज्ञानलालसा-अरेरे ! निव्वळ खोटे आरोप आहेत हे माझ्यावर !

**रावसाहेब**—नाहीं तर आमचा हा शंख ! दगड धोंडोबा आहे नुसता ! ग्रॅज्युएट-डबल ग्रॅज्युएट-झाला असता तर वशिल्याच्या जोरावर कुठं तरी सरकारी ऑफिसरच्या जागेवर चिकटवून दिला असता—

**बाबूराव**—(स्वगत) कशानं सरसानं कीं डिंकानं ?—

**रावसाहेब**—बाबूराव, आम्हीं मोठ्या गरिबींतून वर डोकं काढलं-कसं तें आमचं आम्हांला ठाऊक-दारोदार भिक्षा मागितली, घरोघर माधुकरी मागितली-अर्धपोटीं-कधीं कधीं अगदीं उपाशीं राहून अभ्यास केला बरं-पुढं वार—

**बाबूराव**—म्हणजे ? वार कसले-स्वतःचा लिलांव तीन वार पुकारलांत कीं काय ?

**रावसाहेब**—तसं नव्हे, वार लावले. अहो, मला आठवतं-दोन महिने नुसता पाण्यावर जगलों-अन्न मिळालं नाहीं !

**बाबूराव**—वाहवा ! हें खरं पाणी ! वाहवा !

**रावसाहेब**—म्युनिसिपालिटीच्या कंदिलाच्या उजेडांत-रस्त्यावर रात्रभर उभा राहून अभ्यास केला—

**बाबूराव**—वाहवा-वाहवा—

**रावसाहेब**—अहो, कधीं कधीं तर रानावनांत भटकून काजव्याच्या प्रकाशांत पुस्तकं वाचलीं—

**बाबूराव**—वाहवा-वाहवा—

**रावसाहेब**—आणि असे कष्ट काढले म्हणून असा आज रावसाहेब झालों-

**बाबूराव**—वाहवा-वाहवा—

**रावसाहेब**—नाहीं तर-तुम्ही-चैनी, व्यसनी, आळशी !

**बाबूराव**—कोण ? मी-वाहवा-वाहवा—

**रावसाहेब**—मी तुम्हांला म्हणत नाहीं. हे आमचे दिवटे चिरंजीव-हा-हा-गाढवाचा लेक—

**बाबूराव**—गाढवाचा लेक !-अगदीं बरोबर-वाहवा-वाहवा ! रावसाहेब,-तुमचा कान करा इकडे—

**रावसाहेब**—हां-हा धरा कान. काय म्हणतां ?

**बाबूराव**—विद्याधराच्या दुःखावर डागण्या देऊं नका. या वेळीं—

**रावसाहेब**--अरे हरामखोरा ! दुःखावर डागण्या कसल्या ? विद्याधर-तुझं तोंड सुद्धां पाहणं नको-चल चालता हो घरांतून-भिक्षा मागून पोटभर. खेरीज अद्दल घडणार नाहीं. पैशाची किंमत नंतर कळेल—

**विद्याधर**—बाबा-मला पैशाची किंमत कळते. तुमची एक पैसुध्दां मी आजवर अनाठायीं खर्च केली नाहीं. दुर्दैवानं नापास झालों; पण अभ्यास केला कीं नाहीं हे त्या परमेश्वरालाच ठाऊक—

**रावसाहेब**—वर आणखी थोर तोंडानं-बेशरमपणानं-बोलतोस-? चल-चालता हो घरांतून—

**विद्याधर**—मर्जी आपली-पण यापुढं तरी देव मला यश देवो असा मला अंतःकरणापासून आशीर्वाद द्या. [ पाय धरतो.

**रावसाहेब**—( लाथ मारून ) हा घे आशीर्वाद. [जातो.

**बाबूराव**—विद्याधर, मूर्खासारखा आशीर्वाद कशाला मागितलास ?

**विद्याधर**—किती जरी झालं तरी ते वडील आहेत.

**बाबूराव**—ते तुझ्यामाझ्यापेक्षां वयानं वडील आहेत हें मी जाणतों—

**विद्याधर**—ते माझे परमपूज्य तीर्थरूप आहेत.

**बाबूरावः**—पण त्या तीर्थरूपांनीं आशीर्वादाचा तीर्थप्रसाद कसा झणझणीत दिला ! विद्याधर, चल आपण आतां दोघेही समदुःखी झालों. मी घरांतून ऐटीनं बाहेर निघालेला-आणि तुला नामुष्कीनं घरदार वर्ज्य झालेलं-ही सुशिक्षित बेकारांची जोडगोळी—

**विद्याधर**—माफ कर. या वेळीं कांहीं बोलूं नकोस-तूं जा. तुझे व माझे मार्ग भिन्न आहेत.

**बाबूराव**—ऑलराईट ! गुड डे ! [ जातो.

**मालती**—भाऊ, काय ही बाबांची निष्ठुरता ! त्यांचं तुझ्यावर कितीतरी प्रेम-पण—

**विद्याधर**—ताई, बापाचं प्रेम असंच असतं. मुलानं मोठेपणीं आपल्या नांवलौकिकांत भर घालावी-पैसा कमवावा-म्हातारपणीं सुख द्यावं-हा स्वार्थ बाबांच्या प्रेमांत असणारच. मी नापास झालों. त्यांच्या स्वार्थसिद्धीच्या आशेचा मार्ग अंध झाला. त्यांना संताप कां येणार नाहीं ? पण तेंच आईचं प्रेम ! अहाहा!

**विसांवा एकला जीवा। जगीं ही देवता माता ॥ ध्रु०॥ जननिचा लेकरां थारा। पसारा प्रीतिचा सारा नसे उपमाहि उपकारा। जगीं ही देवता माता ॥ १ ॥ सुचेना स्वार्थ प्रेमाला। रुचेना लोभ मायेला। सुखाचा स्वर्ग सजलेला। जगीं ही देवता माता ॥ २ ॥**

**मालती**—आज आई जिवंत असती तर–पण ती पहा तिची तसबीर–ती तुझ्याकडे प्रेमाच्या करुण दृष्टीनंच पहात आहे—

**विद्याधर**—आई–क्षमा कर–आजपासून हा तुझा लाडका विद्याधर–तुझ्या नित्य दर्शनाला–तुझ्या पूजेला–घरादाराला अंतरला—

**मालती**—म्हणजे ? भाऊ, तूं जाणार तरी कुणीकडे ?

**विद्याधर**—दुर्दैव नेईल तिकडे—

**मालती**—जरा पहा तरी इकडे.

**रावसाहेब**—(आंतून) मालती–मालती–मालन—

**विद्याधर**—ताई–जा–बाबा तुला हांका मारताहेत. मी जातों–पित्राज्ञाभंगाचं पाप टाळण्यासाठीं इथून मला टळलंच पाहिजे. [ जातो.

**मालती**—दादा–दादा—

**रावसाहेब**—मालती—

**मालती**—बाबा, दादा खरंच गेला ? कुठं गेला ?

**रावसाहेब**—गेला असेल मरायला. कुठं जातो कार्टा ? जगाच्या लाथा खाऊन येईल चार दिवसांनीं आपोआप परतून घरीं—

---

## प्रसंग चौथा

[ स्थळ—रस्ता. **बाबूराव** प्रवेश करतो. ]

**बाबूराव**—दुनियेंतले देखावे एकेक दिसायला लागले. व्यवहारी जगाच्या आखाड्यांत उडी टाकतांच डोळ्यावरची धुंदी उतरूं लागली. इतके दिवस नोकरीसाठीं या मुंबईत पायपीट करतों आहें; पण नोकरी नाहीं. नोकराची कुणालाच गरज नाहीं ! सारेच शिंचे नोकर बनले कीं काय ? चहूंकडं नोकरशाहीचाच नंगा नाच ! हा बाबूराव बी. ए. नोकरी मिळत नाहीं म्हणून प्राण सोडणार !

**जे. हॅरी**—(प्रवेशून) हॅलो मिस्टर बाबूराव-प्राण सोडणार ? कोण तुम्ही ? प्राण सोडणार म्हणजे ?

**बाबूराव**—म्हणजे काय ? मरून जाणार ?

**जे. हॅरी**—कुठं ?

**बाबूराव**—स्वर्गांत ! तिथं तरी व्हेकन्सी आहे कीं नाहीं ! स्वर्गांत जागा नसली तरी नरकांत खास मिळेल.

**जे. हॅरी**—एकूण नोकरीच्या खटपटींत आहेस तूं ! पण मित्रा, नोकरीला काय तोटा-या मुंबईत नोकरीला काय तोटा ?

**बाबूराव**—अरे बाबा, मलाही असंच वाटत होतं. पण उलटा अनुभव आलान् भ्रमाचा भोपळा फुटला—

**जे. हॅरी**—रेलवे, पोस्टखातं, बँका, शाळा—

**बाबूराव**—सारीं खातीं पालथीं घातलीं ! सरकारी-खाजगी सऱ्या संस्थांना भेट दिली; पण नोकरी नाहीं. देशी-विदेशी फर्म्स धुंडाळलीं ! नोकरीचा पत्ता नाहीं.

**जे. हॅरी**—पूर्वी कुठं नोकरी केली आहेस ? कांहीं अनुभव—

**बाबूराव**—नाहीं.

**जे. हॅरी**—शॉर्ट हॅण्ड टायपिंग येतं ?

**बाबूराव**—नाहीं.

**जे. हॅरी**—अकौंटन्सी-कॉरस्पाँडन्स.

**बाबूराव**—नाहीं.

**जे. हॅरी**—मग तुझ्यासारख्या अनुभव नसलेल्या नवशिक्या कॉलेजमधल्या कोऱ्या करकरीत कोरड्या ग्रॅज्युएटला कोण नोकरी देणार ?

**बाबूराव**—सारेजण असंच म्हणतात. अनुभव हाच येतो.

**जे. हॅरी**—पण हे गठ्ठे कसले ?

**बाबूराव**—माझ्या कर्मांचे ! हें बी. ए.चं सर्टिफिकेट ! हा नोकरीच्या अर्जाचा नमुना.

**जे. हॅरी**—म्हणजे ? बी. ए. झालास तरी नोकरीसाठीं अर्ज कसा करायचा तुला माहीत नव्हतं ?

**बाबूराव**—नव्हतं रे बाबा. पुढं पहा. हे अर्ज ! हा गठ्ठा अजून टपालपेटींत

टाकायचा. नुसत्या टपालहंशिलासाठीं व उलट उत्तराच्या तिकिटांसाठीं पन्नास रुपये खर्च केले !

**जे. हॅरी**—माय गॉड ! बरं, हे गठ्ठे कसले ?

**बाबूराव**—हीं ताजीं वर्तमानपत्रं आहेत. इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू, गुजराथी साऱ्या भाषेंतलीं हीं वर्तमानपत्रं.

**जे. हॅरी**—कशाला गोळा केलींस ? न्यूजपेपर एजंट होतोस कीं काय ?

**बाबूराव**—अरे बाबा, वॅाँटेडच्या जाहिराती पाहण्यासाठीं ! आत्तां अशीच एक जाहिरात पाहिलीन् लगेच त्या समोरच्या फर्ममध्यें गेलों. तोंच काय ? ती पांच मिनिटांपूर्वीं मोकळी असलेली जागा मी जातांच भरून गेलेली. नशीब असं माझ्यापुढें रेसच्या घोड्याप्रमाणें धावतं आहे !

[पडद्यांत गलबला.]

अरे. पण ही गडबड कसली ? कुठं आग लागली कीं काय ? धावा ! धावा ! आगीचा बंब ! बोंब तरी मारा !

[**विद्याधर** येतो.]

**विद्याधर**—बोंबाच मारताहेत सारेजण--

**बाबूराव**—म्हणजे—?

**विद्याधर**—अरे, आग लागलेली नाहीं. त्या फर्ममध्यें एक दरमहा वीस रुपयांची कारकुनाची जागा रिकामी आहे; त्या जागेसाठीं अर्जांचीं-सर्टिफिकेटांचीं-वशिल्याच्या पानांचीं भेंडोळीं घेऊन शेंपन्नास पदवीधरांचा तांडा नशीवापाशीं टक्कर देत उभा आहे !

**बाबूराव**—काय म्हणतां ? वीस रुपयांच्या जागेसाठीं एवढी बोंब ? अरेरे ! पण चला-आपणही आपल्या दैवाची परीक्षा पाहूं—

**विद्याधर**—तुझ्यापेक्षां मोठमोठया क्वालिफिकेशनचे लोक आहेत. कुणी फर्स्टक्लास ग्रॅज्युएट—

**बाबूराव**—आय् सी !

**विद्याधर**—कुणी डबल ग्रॅज्युएट—

**बाबूराव**—ओ लो !

**विद्याधर**—कुणी B. A., M. A., LL. B.—

**बाबूराव**—माय गॉड ! मग अशा ठिकाणीं माझ्यासारख्या एका साध्या जळक्या बी. ए.चा काय पाड ? पण तूं इकडे कुणीकडे ?

**विद्याधर**—तुझ्यासारखाच नोकरीच्या मार्गाकडे—

**बाबूराव**—हरहर ! काय हा प्रसंग ! हें नाटक कीं हा सिनेमा ?

**विद्याधर**—सिनेमा-नाटक नव्हे ! हें प्रत्यक्ष व्यवहारांतील एक वास्तविक चित्र आहे ! हें हल्लींच्या सुशिक्षित पदवीधरांच्या बेकारीचं भयंकर दृश्य आहे.

**बाबूराव**—छे-छे-चोहोंकडून निराशेनं कोंडमारा केला !

**जे. हॅरी**—निराश होऊं नकोस. मी तुला नोकरी मिळवून देतों.

**बाबूराव**—माझ्या परमेश्वरा ! उपकार होतील-हिमालयाएवढे उपकार होतील; माझ्या या पोकळ डोक्यावर ! आजपर्यंत सहा महिने तुझ्यासारख्या दिलदार दोस्तांच्या उपकारावरच जगलों ! त्यांच्याच पैशावर चंगल केली, पण आतां एक पैसुध्दां कुणी उसनी देत नाहीं कीं क्षणभर दारांत उभा राहूं देत नाहीं.

**जे. हॅरी**—कुणी दारांत उभं करूं देत नाहीं तर दुसऱ्याच्या दारीं जा कशाला ?

**बाबूराव**—मग काय एकदम घरांतच घुसावं म्हणतोस कीं काय ? छान् !

**जे. हॅरी**—नो जोक. थट्टा राहूं दे. आमच्या मिशन्स् स्कूलमध्यें एक नोकरी आहे. चाळीस रुपयांचा जॉब पत्करतोस ?

**बाबूराव**—हंः ! पत्करतोस म्हणून काय विचारतोस? या क्षणाला डोक्यावर पाय घेऊन तुझ्याबरोबर धांवत येतों ना ! चल-पळ-धूम ठोक !

**जे. हॅरी**—थांब, थांब. पळतोस कुठं ?

**बाबूराव**—अरे नोकरीकडे ! जागा जाईल ना ? छे, छे, छे ! गिरगांवांत भाड्यानं बिऱ्हाडाला जागा मिळेल; पण उभ्या मुंबईत ग्रॅज्युएटला नोकरीसाठीं जागा कांहीं मिळत नाहीं !

**विद्याधर**—आत्तां जागा झालास वाटतं ? पण काय-कसली नोकरी म्हणताहेत हे जे. हॅरी ?

**बाबूराव**—ऐकूं नकोस, लांब उभा रहा. ऐकूं आलं तरी ऐकूं नकोस हो ! जागा आहे एक, तिथं दोघांच्या उड्या नकोत. ती काय मजुरांची चाळ आहे, कीं कलकत्त्याच्या अंधारकोठडीप्रमाणं शेंदोनशें माणसें मावण्याइतकं प्रशस्त स्थळ आहे ? नवऱ्यामुलाचं स्थळ समज ! तिथं एकाच नवऱ्यामुलीची सोय होणार ! कां, खरं ना हॅरी ?

**विद्याधर**—ठीक. याचको याचकम् दृष्ट्वा...

**बाबूराव**—श्वानवत् गुरगुरायते.

**जे. हॅरी**—असं कां म्हणतां? तुम्हां दोघांनाही जॉब मिळेल.

**विद्याधर**—पण चाळीस रुपड्यांचाच ना!

**जे. हॅरी**—तसं नव्हे. माझ्यासारखा नॉन् मॅट्रिक फाटका मनुष्य आज शंभर रुपये कमावतो आहे, त्यांतलं इंगित काय?

**विद्याधर व बाबूराव**—काय?

**जे. हॅरी**—धर्मांतर!

**विद्याधर**—हर हर!

**जे. हॅरी**—विद्याधर, आश्चर्य वाटलं तुम्हांला. तुमच्याप्रमाणंच मी हिंदु आहें. केवळ नोकरीसाठीं ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली आणि जयहरीचा जे. हॅरी बनलों. आणिं म्हणूनच—या पदवीला चढलों. तेव्हां तुमचीही तशी तयारी असेल तर—

**बाबूराव**—तयारी म्हणजे! ही तयारी केली नाहीं तर मग शेवटच्या यात्रेचीच तयारी केली पाहिजे. मित्रा, काय सांगू रे? धर्मांतरच काय, पण पोटासाठीं देशांतर, वेषांतर, भाषांतर, लिंगांतर सुद्धां करायला तयार आहें. नोकरीसाठीं साहेबांचे बूट पुशीन! त्यांच्यापुढं नाक घाशीन!! तोंडाला जन्माचं काळं फाशीन!!!

**जे. हॅरी**—ब्रेहो! चल तर, तुझ्यासाठीं मी वाटेल ती झीज सोशीन! विद्याधर—

**विद्याधर**—क्षमा कर. पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठीं प्राणांत—घेतला तरी धर्मांतर करायला मी तयार नाहीं. हिंदुधर्मांत जगेन—हिंदुधर्मांतच मरेन हाच माझा संकल्प. स्वार्थासाठीं सैतान बनून धर्माच्या नरडीला नख देण्याला मी कालत्रयींही तयार होणार नाहीं.

**जे. हॅरी**—मग तुम्हांला नोकरी मिळणार नाहीं.

**विद्याधर**—पर्वा नाहीं. अन्नपाण्याविना टांचा घासून प्राण सोडीन. पण माझा धर्म मी सोडणार नाहीं.

**बाबूराव**—फर्स्टक्लास फूल आहेस! जे. हॅरी! चला, या मूर्खाच्या संगतीनं आपला कार्यनाश व्हायचा.

**विद्याधर**—बाबूराव! नको, हा अविचार करूं नको. हात जोडतों पायां

पडतों; पण माझ्या देशबंधो, केवळ नोकरीसाठीं, ऐषआरामासाठीं, स्वतःच्या नीच स्वार्थासाठीं स्वतःच्या धर्माला पायाखालीं तुडवूं नकोस. तूं सुशिक्षित आहेस, समंजस आहेस, हा आत्मघातकी धर्मद्रोह करूं नकोस. चल, आपण दोघेही पुन्हा फिरून प्रयत्न करूं. मिळाली नोकरी तर ठीक, नाहींतर दारोदार भीक मागूं. ते पहा, कितीतरी सुशिक्षित तरुण बेकार भटकत आहेत! जना-मनाची भीडमुर्वत मोडून हातीं सांपडेल तो हलकासलका धंदा करून अन्नं पोट भरीत आहेत. ते, ते पहा, ते तिघे तरुण एके काळीं आपल्याच बरोबर शिकत होते. तो वर्तमान-पत्रं विकणारा नाक्यावरचा तरुण इंटरची परीक्षा पास आहे. तो दुसरा ग्रॅजुएट् फेरीवाल्याचा पेशा पत्करून खणलुगडीं घेऊन चाळीचाळींतून फिरत आहे. तो तिसरा ग्रॅज्युएट पहा—साहेबाचा शॉफर होऊन त्याची मोटार हांकतो आहे.

**बाबूराव**—डॅम् दॅट्! नॉन्सेन्स्! हीं दुर्दैवाचीं रडकीं चित्रं तूंच पहात बैस. मिस्टर जे. हॅरी—कुइक् मार्च! [ जातात.

**विद्याधर**—हरहर! परमेश्वरा, काय ही आम्हां पदवीधर पढतमूर्खांची केविलवाणी अवस्था! काय करूं? जीवाची ओढाताण चाललेली आहे. धर्माला कवटाळून मृत्यूला मिठी मारूं, कीं धर्माला लाथाडून स्वार्थाच्या सैतानाची सोबत करूं? पण नाहीं. बेहेत्तर आहे, याच दैन्यावस्थेंत मरण आलें तरी! पण माझा धर्म मी सोडणार नाहीं. दुर्गतीचें साधन जोडणार नाहीं.

**आढ्यता रिकामी। पात्रता न मन मात्र संभ्रमीं। छात्र**
**बुडत अज्ञानतमीं ॥ध्रु०॥ शिक्षणक्रम हा विद्याधामीं।**
**गमत हितावह नामी। तरुण मन बुडे मोह-कर्दमीं।**
**जाती दुर्गतिगामी ॥ १ ॥** [जातो.

---

## प्रसंग पांचवा

[ स्थळ—बॅकबे. ]

**शेवंती**—मालती, तुझा विद्याधरभाऊ घरांतून एकदां गेला तो पुन्हा परत एकदां सुद्धां फिरकला नाहींना?

**मालती**—छे ग! दिवसामागून दिवस गेले, महिन्यामागून महिने गेले; पण पत्ता नाहीं. पण तुझा दादा तरी?

**शेवंती**—तो तर काय डोक्यांत राख घालूनच घराबाहेर पडला आहे. त्याचा स्वभाव—

**मालती**—आमच्याच बाबांच्या वळणाचा, शेवंती, काय सांगूं ! भाऊ गेल्यापासून घर कसं खायला उठलंय्. मला तर कांहीं घटकाभरही चैन पडत नाहीं.

**शेवंती**—तरीच आजकाल माझ्याबरोबर बॅकबेवर फिरायाला येऊं लागलीस.

**मालती**—पण चल ना, आतां किती वेळ बसायचं ? अंधार पडत चालला. तुझं फिरणं संपलं नाहीं वाटतं अजून ?

**शेवंती**—बैस ग, जाऊं म्हणे. माझं अजून नाहीं फिरणं संपलं. मला नाहीं कुणाची भीति वाटत. मी आठ आठ वाजेपर्यंत इथं अश्शी एकटी फिरतें.

**मालती**—बरीच धीट झाली आहेस.

**शेवंती**—धीट झालंच पाहिजे. दिवसेंदिवस बायकांचा भित्रेपणा पुरुषांच्या वांट्याला जाऊं लागला आहे !

**मालती**—तरीच ! पुरुषांचा उद्धटपणा—तसं नव्हे पराक्रम—बायकांच्या अंगांत संचरूं लागला आहे ! तूं बैस फिरत. मी जातें.

[ शेवंती जाते.

[ मालती जाऊं लागते, तोंच दुरून **विद्याधर** तिला खुणा करूं लागतो.]

**मालती**—अग बाई ! हा कोण मेला धटिंगण इकडे येत आहे ! घाबरून गेल्यामुळं माझे पाय तर जागच्याजागींच खिळून राहिले आहेत !

**विद्याधर**—( जवळ येऊन ) घाबरूं नकोस अक्का, घाबरूं नकोस. तूं मला ओळखलं नाहींस का ?

**मालती**—नाहीं, कोण तुम्ही ? चला व्हा दूर.

**विद्याधर**—( गहिंवरून ) अक्का, अक्का, साऱ्या जगाप्रमाणं तूं सुद्धां मला दूर लाथाडतेस का ? बाबांच्याप्रमाणं तुलाही मी परका झालों का ? हा पहा, मी विद्याधर तुझ्यापुढं उभा आहें.

**मालती**—( एकदम मिठी मारून ) कोण माझा भाऊ ! भाऊ ! तूं इतके दिवस होतास तरी कुठं ?

**विद्याधर**—इथंच, या मुंबईत नोकरीसाठीं बेकार होऊन भटकत होतों !

**मालती**—काय, मुंबईतच होतास ? कुणी म्हणत होतं तूं कलकत्त्याला गेलास. कुणी म्हणत होतं बडोद्याच्या जलप्रलयांत सांपडलास— (रडूं लागते.)

**विद्याधर**—अक्का, रडूं नकोस. जलसमाधि मिळाली असती तर किती छान् झालं असतं. या कोरड्या प्रळयापेक्षां तो ओला प्रलय कमी दुःखाचा खास !

**मालती**—पण भाऊ, काय रे तुझी ही कंगाल कष्टावस्था! तूं आजारी का आहेस?

**विद्याधर**—होय. दहा दिवस झाले तापानं पछाडलं. त्यांतूनही आज दोन दिवसांचा उपवासी.

**मालती**—मग अगोदर घरीं चल. माझ्या हातांनीं मी तुला स्वयंपाक करून जेवूं घालतें.

**विद्याधर**—बाबांच्या मर्जीविरुद्ध घरांत पाऊल कसं ठेवावं ? तुझ्या प्रेमाचं ताट लाथाडून हा विद्याधराच्या शरीराचा घांस काळाच्या जवड्यांत पडणार.

**मालती**—म्हणजे ? म्हणतोस तरी काय ?

**विद्याधर**--दुसरं काय, मरणाचा निश्चय करून या वेळीं मी इथं आलों आहें.

**मालती**—भाऊ, भाऊ, नकोरे, हा भयंकर अविचार करूं नकोस !

**घातला घाला। नशिबानें रडविला ॥ ध्रु० ॥ प्रेम-**
**भाव ओसरला। सिंधुदयेचा सरला। पथ अघोर**
**अनुसरला। वैतागुनि या काला। सुखाचा यशाचा**
**तुटला झोला ॥ १ ॥**

तुला घरीं यायचंच नसेल तर घे; तूंच एकदां भाऊबीजेला ओवाळणीला दिलेली ही हिऱ्याची आंगठी घे. बाजारांत विकून कांहीं दिवस तरी पोटाची गुजराण कर. भाऊ, ही घे ना ? बोल, तूं बोलत कां नाहींस ?

**विद्याधर**—बोलूं, काय बोलूं ? तुझ्या बंधुप्रेमानं मला या वेळीं मुकं केलं आहे ! अक्का ही हिरकणी माझ्याजवळ नको. प्रसंगीं ही हिरकणी चावून सुद्धां प्राण सोडण्याचा मोह मला आवरणार नाहीं. ( आंगठी परत देतो.) अक्का, तूं जा, बाबांना माझा शेवटचा नमस्कार सांग. ( जाऊं लागतो.)

**मालती**--भाऊ, भाऊ !

[ पडद्यांत लोकांचा गलबला ऐकूं येतो. मोटारचें शिंग वाजतें.]

**विद्याधर**--काय, कसली गडबड, अरे बापरे, मोटार ॲक्सिडंट !

[मालती व विद्याधर जातात. **धनवंतराव** प्रवेश करतो.]

**धनवंतराव**—आठ वाजून गेले. कार्टी अजून बॅकबेवर भटक्या मारते

आहे. तो पोरगा तसा बेफाम निघाला ही अशी बेफाट झाली ! अरे हो, पण ॲक्सिडंट ! कोण माझी शेवंतीच ?

[ जाऊं लागतो. इतक्यांत **विद्याधर, मालती** व **शेवंतीला** घेऊन येतात.]

**धनवंतराव**—हा काय ॲक्सिडंट झाला ?

**विद्याधर**--झाला नाहीं, व्हायचा टळला. रस्ता ओलांडतांना मोटारच्या धक्क्यानें खालीं कोलमडल्यामुळें यांना थोडीशी फेंट आली आहे इतकंच.

**शेवंती**—बाबा, घाबरूं नका.मला कांहीं कुठं दुखापत झाली नाहीं.ह्या गृहस्थांनीं मला एकदम मागं खेचलं नसतं तर मात्र मोटारखालीं चेंगरून मी मेलें असतें.

**धनवंतराव**--वा वा ! मोठे उपकार झाले बुवा तुमचे.

**विद्याधर**—त्यांत उपकार कसले ! धनवंतराव, तुम्हीं मला ओळखलं नाहीं?

**धनवंतराव**--कोण ? रावसाहेबांचा विद्याधर ?

**मालती**--(धनवंतरावास एकीकडे) भाऊ आत्महत्त्या करणार म्हणतो.

**धनवंतराव**—म्हणजे, (मालती कानांत सांगते) काय म्हणतेस ? विद्याधर ! धिक्कार असो तुम्हांला. परीक्षेंत नापास झालांत—पदवीचा लाभ झाला नाहीं—पोटापुरतीही नोकरी मिळाली नाहीं म्हणून अशा भयंकर रीतीनं वैतागून जिवावर उदार झालांत ? तुमचा विवेक कुठं गेला ?

**विद्याधर**—धनवंतराव ! पदवीसाठीं मी प्राण सोडीत नाहीं. निराशेनं जिवाचा कोंडमारा केल्यामुळं माझ्यासारखे कितीतरी परीक्षेचे बळी जगांत असेच मृत्यूला मिठ्या मारतात !

**धनवंतराव**—त्या परीक्षा आणि त्या पोकळ पदव्या जाऊं देत मसणांत. चालू शिक्षणपद्धतीच्या गुणदोषांची चर्चा करण्याची माझी इच्छा नाहीं. शिवाय त्या विषयाचा ऊहापोह करण्याचें हें स्थळ व हा काळही नव्हे. पण आधीं घरीं चला. माझ्या शेवंतीला तुम्हीं जीवदान दिलंत; तुमच्या उपकाराची फेड मला अंशतः केलीच पाहिजे. नोकरीचा, परीक्षेचा, पदवीचा नाद सोडून द्या. भलताच आततायीपणा करू नका. बाबूरावाच्या ठिकाणीं आतां मी तुम्हांलाच समजतों. उद्यांपासून माझ्या कारखान्यांत चला आणि आपली बुद्धि, आपली कर्तबगारी, उपयुक्त धंदेशिक्षण घेऊन व्यापारांत यश स्वीकारा.

**मार्ग हा वैभवा। सुयश सुखसंभवा ॥ ध्रु० ॥**
**उद्योग हा देव भावें भजावा। सामर्थ्य ये आत्मरत मानवा ॥ १ ॥**

**विद्याधर**--धनवंतराव ! यशाचा उजळ मार्ग दाखविणारे आजपासून तुम्हीच माझे परमेश्वर. [पाय धरतो. पडदा पडतो.

---

## प्रसंग सहावा

[ ख्रिस्ती झालेला **बाबूराव** प्रवेश करतो. ]

**बाबूराव**—अरेरे, पुन्हा नशिबानं झक् मारलीच ! माझ्या कुंडलींतले सारे शुभग्रह गुजराथच्या जलप्रलयांत सांपडून स्वर्गाला चढले, कीं जयंती बोटीबरोबरच ससुद्राच्या तळाशीं बुडाले ! नोकरीसाठीं धर्मांतर केलं–हिंदूचा बाटग्या किरिस्ताव बनलों ! पण शेवटीं त्या शाळेच्या कडक शिस्तीला कंटाळून गेलों. अडला नारायण म्हणून शाळेच्या हेडमास्तरचे–त्या गाढवाचे पाय धरले; पण शेवटीं त्यानंच माझा हात धरून मला झिडकारून लावलें. पुन्हा आम्ही अडणीवरचे शंख फिरतोंच आहोंत शंख करीत ! छे ! छे ! 'परधर्मो भयावहः' हेंच खरं !

**विद्याधर**—( प्रवेशून ) कोण ? बाबूराव ? कां, अशी रडकी मुद्रा कां ?

**बाबूराव**—दुर्दैवाच्या नांवानं रडतोंच आहें म्हणून !

**विद्याधर**—सोन्यासारखी मास्तरकीची नोकरी मिळाली—

**बाबूराव**—मास्तरकी नसून ती म्हारकी ठरली ! सोनं नव्हे तें पितळ ठरलें ! शेवटीं नशिबानंच माझं नरडं दाबून धरलं !

**विद्याधर**—कां बुवा ?

**बाबूराव**—शिकवण्याला नालायक म्हणून मला राजीनामा देण्याला त्या स्कूलच्या हेडमास्तरानं भाग पाडलं ! धर्मांतर केलं ! पण अखेर नालायख शिक्षक म्हणून घेणं नशिबीं आलं !

**विद्याधर**—पण असा डरतोस का ? तुझ्याजवळ बी. ए.चं कोरं करकरीत सर्टिफिकेट आहे ना ?

**बाबूराव**—इतके दिवस त्याची किंमत मला वाटत होती. पण करायचं आहे काय त्या सर्टिफिकेटाच्या सुरळीचं ! एखाद्या नाटकाच्या हँडबिलइतकी सुद्धां त्याची किंमत या जगाच्या व्यवहारी बाजारांत नाहीं ! मला आतां पश्चात्ताप होतो–रडूं कोसळतं–पण रडूं तरी कुठं आणि कुणाजवळ ? घरादाराला

मुकलों–स्वधर्माला आंचवलों–! विद्याधर, तूं बी. ए. झाला नाहींस म्हणून बेकार! आणि मी बी. ए. होऊन बेकार! परीक्षा पास व्हाव्यात आणि नालायख नोकरीच्या घाण्याला नंदीबैलाप्रमाणं जुंपावं हेंच ध्येय! पण नोकरी-सुध्दां मिळत नाहीं. तुला तरी कुठं मिळाली का नोकरी?

**विद्याधर**—नोकरीचं नांव काढूं नकोस! नोकरीवर लाथ मारली आहे मीं आणि स्वतंत्र धंदेशिक्षण घेऊन व्यापारांत डोकं घातलं आहे.

**बाबूराव**—उत्तम! लाथ मारीन तिथं पाणी काढीन हा माझा भ्रम व्यर्थ ठरला आणि लोकांच्या लाथा खाऊन डोळयांतून पाणी काढण्याखेरीज मार्ग नाहीं उरला! खरंच, बी. ए. होण्यासाठीं वेळ, श्रम, पैसा फुकट खर्च करण्याऐवजीं–हाडाचीं काडं–रक्ताचं पाणी करण्यापेक्षां—

**विद्याधर**—पदवीचा नादान नाद सोडून द्यावा हें तुला आतां तरी पटलं ना? कळलं ना?

**बाबूराव**—कळलं पण वळत नाहीं–पदवीचा मोह अजुनी सुटत नाहीं! पण आजकाल तूं करतोस काय?

**विद्याधर**—तुझ्या वडलांच्याच कारखान्यांत वीणकाम आणि रंगकला यांचं प्राथमिक शिक्षण घेत आहें. एवढं शिक्षण आटोपलं कीं नंतर पुढील शिक्षणा-साठीं जर्मनी–जपानांत जाण्याचा हेतु आहे.

**बाबूराव**—काय म्हणतोस? अरेरे! मींच अखेर या बी. ए.च्या भरीला पडून गाढव ठरलों. कुठं तें मजेदार कॉलेजलाईफ! आणि कुठं हें रूक्ष व्यवहाराचं रेचेड लाईफ! कॉलेजांतली पहिली सहा महिन्यांची टर्म खेळण्यांत बागडण्यांत घालवावी. काव्य-शास्त्र-विनोदांत रंगून जावं–नाटकं–सिनेमा झोडावींत–मजा–रोमान्स–चार्म! परीक्षा जवळ आली कीं झोंपेंतून जागा झाल्याप्रमाणं अभ्यासासाठीं हातपाय झाडावेत. टेक्स्ट् बुकं विकत घ्यावींत–नोट्स् घोकाव्यात आणि कशी-तरी परीक्षेची तयारी करावी. पण, हाच तो परीक्षेचा बंदा बाबूराव आजकाल केवळ बेकारीचा धंदा करीत भटक्या मारतो आहे. विद्याधर, मला कांहीं मार्ग दाखीव. बी. ए. झालों पण हॉटेलखाणावळींतल्या वाढप्याची–आचाऱ्याची–साहेबाच्या पट्टेवाल्याची–गिरणींतल्या मजुराची–छापखान्यांतल्या प्रूफकरेक्टरची, एखाद्या नाटक कंपनींतल्या भाजीमास्तराचीसुध्दां नोकरी मिळत नाहींरे!

**विद्याधर**—नोकरीचा तपास तरी योग्य दिशेनं केलास का?

**बाबूराव**—आतां फक्त या आयुष्याच्या अंधारांत हातांत प्रभाकरकंदील घेऊन किंवा डोक्यावर किटसनची बत्ती घेऊन नोकरी शोधायचं बाकी उरलं आहे. फुकट भाराभर पुस्तकं वाचलीं—शेले-शेक्स्पिअर उरावर नाचवले—पुस्तकी पोपटपंची केली; पण फुकट ! त्यापेक्षां प्रत्यक्ष हमाली केली असती तरी आज स्वतंत्रपणानं रोजीं दोन चार रुपये कमवायला मरण नव्हतं—

**विद्याधर**—खरं आहे. या शिकलेल्या पढतमूर्ख हमालापेक्षां रोजमुऱ्यावर बैलाप्रमाणं रात्रंदिवस राबणारे ते हमाल—स्टेशनवरचे कुली-लाखपटीनं सुखी आहेत ! बाबूराव, तूं आतां असं कर. धनवंतरावांकडे चल-त्यांचे पाय धर–क्षमा माग-तुझे ते प्रेमळ पिते आहेत—

**बाबूराव**—नको–त्यांच्याकड हें काळं तोंड घेऊन जाणं नको. माझ्या तोंडाला असलं अव्वल दर्जाचं काळं माझं मींच फासून घेतलं आहे कीं तें धुवायला काळ-सागरांतच उडी घेतली पाहिजे. जगातलं रसायनशास्त्रसुद्धां तें काळं धुवून टाकायला कुचकामीं ठरेल ! विद्याधर अद्याप मला नोकरीची थोडी फार आशा आहे–कुठंही जातों–हमाली करतों—

**विद्याधर**—पण हमाली करायलाही धडधाकड शरीर पाहिजे. तूं तर असा पेजेनं पोसलेला रडतराव—

**बाबूराव**—या परीक्षेच्या पायीं आरोग्याचं खोबरं झालं. शरीरसंपत्ति गमावली–डोकेंसुद्धां गमावून बसलों ! विद्याधर, मी दोन दिवसांचा उपाशीं आहें ! काय करूं ! अक्कल तर चालत नाहींच पण हातपायसुद्धां चालत नाहींत रे ! मला रुपया आठ आणे दे. दोन दिवस जातील त्यावर चहा पाव खाऊन !

**विद्याधर**—हा घे रुपया. पण मूर्खा, घरीं चल. स्वतःला अक्कल नाहीं अन् दुसऱ्यानं सांगितलेलं ऐकायचं नाहीं !

**बाबूराव**—मला आतां कुणाचंच कांहीं ऐकायचं नाहीं. पण तूं आतां निघालास कुणीकडे ?

**विद्याधर**—आज माझं व्याख्यान होतं.

**बाबूराव**—कुठं ?

**विद्याधर**—मारवाडी विद्यालयांत.

**बाबूराव**—विषय ?

**विद्याधर**—सुशिक्षितांची बेकारी—

**बाबूराव**—विद्याधर, बेकारीवरचं व्याख्यान द्यायला तुझ्यापेक्षां मीच अधिक लायक आहें. जिवाला जाळणारे अनुभवाचे बोल मीं लोकांना ऐकविले असते. निदान मी अध्यक्ष तरी झालों असतों आणि अध्यक्षाचा समारोप म्हणून असं बोललों असतों—

**विद्याधर**—कसं-कसं ?

**बाबूराव**—" मद्देश बंधुभगिनींनो, थेरड्या तरुणांनो, आणि तरुण थेरड्यांनो, जगांत वाटेल तें पाप करा; पण पदवीच्या फंदांत पडण्याचं महापाप करूं नका. पदवीचा राक्षसी मोहपाश आंवरा आणि एखाद्या उपयुक्त धंदेशिक्षणाची कांस धरा. शाळा-कॉलेजांतली चालू शिक्षणपद्धति फक्त कारकुनांचे तांडे निर्माण करणारी आहे—शारीरिक-बौद्धिक-नैतिक अधःपात करणारी आहे. गुलामगिरीच्या घाण्याला जन्मभर जनावराप्रमाणं जुंपणारी आहे. माझंच प्रत्यक्ष उदाहरण घ्या! पदवीचं शेंपूट मागं लागलं तरी हा व्यवहारी दृष्टीनं नालायख ठरलेला नंदीबैल आज बेकारीचा बळी झाला ! स्वधर्माचा काळ झाला—माझा धर्म मीं सोडला—"

**शेवंती**—( प्रवेशून ) कोण ? दादा-तूंच का ? तूं तुझा धर्म सोडलास ? आणि कोणत्या धर्मांत गेलास ?

**बाबूराव**—ख्रिस्ती धर्मांत—

**शेवंती**—काय ? तूं बाटगा बनलास ? चांडाळा, तुझ्यासारखा धर्मांतर करणारा कुलांगार घरंदाज घराण्याच्या अब्रूचे—कीर्तीचे कोळसे करण्यासाठीं जिवंत राहिला त्यापेक्षां जन्मतांच कां नाहीं मेलास ?

**बाबूराव**—ताई—ताई—मला क्षमा कर—

**शेवंती**—चल—दूर हो—अहाहा ! ज्याला जगानं शिरावर धारण केलं असा हा त्रिभुवनवंद्य—व्यापक, उदात्त परमप्रिय हिंदुधर्म ! त्या धर्माचा त्याग करून तूं परधर्मांत शिरलास ? ख्रिस्ती झालास ?

**बाबूराव**—होय, ख्रिस्ती झालों. जगांत मला कुणीच कैवारी मायबाप भेटेनात—प्रत्यक्ष बापाला पुन्हा तोंड दाखववायाची लाज वाटूं लागली म्हणून आकाशांतल्या बापाकडे आशेनं तोंड फिरविलं. वाघसिंहाप्रमाणं स्वतंत्र राहण्याची लायकी अंगांत नाहीं म्हणून येशूख्रिस्ताच्या—त्या शेळयामेंढ्यांच्या कळपांत शिरलों. पण ताई, अद्याप मी आचाराविचारानं शुद्ध आहें—मी शुद्धीवर राहूनच बोलतों आहें बेशुद्धींत बोलत नाहीं. माझी शुद्धि करा—नाहीं तर मरण्याखेरीज दुसरा

मार्ग मोकळा नाहीं. हें पहा, आजचा नवा काळ ! बेकारीला कंटाळून एका पदवीधरानं आत्महत्त्या केली ! बेकारीच्या पायींच हा अनर्थ झाला ! मीसुद्धां —

**विद्याधर**—मूर्खा, आत्महत्त्या करतोस कीं काय ?

**बाबूराव**—अलबत् ! हा पहा वस्तरा—वस्तऱ्यानंच गळा कापून—

**विद्याधर**—अरे, पण हा तर सेफटी रेझर !

**बाबूराव**—हाय रे दुर्दैवा ! मरूं तरी कोणत्या उपायानं ! सेफ्टी रेझनूनं गळा कापतां येत नाहीं—आतां गळा काढूनच मोठ्यानं रडतों झालं— [रडूं लागतो.

**धनवंतराव**—(प्रवेशून) कोण बाबू ? रडतोस कां ?

**बाबूराव**—मी रडका पदवीधर आहें. बाबा, मला क्षमा करा. माझी आशा धरूं नका. मी आतां जगाला—त्या युनिव्हर्सिटीला—त्या पुस्तकांना—पदव्यांना—परीक्षांना अखेरचा रामराम ठोकतों—

**धनवंतराव**—बाबू, तूं एक बेवकूफ-बोथट बुद्धीचा बी. ए.—पोकळडोक्या पुस्तकपंडित—पढतमूर्ख पदवीधर—

**बाबूराव**—बाबा—मला आशीर्वाद द्या—मी मेल्यावर ईश्वर माझ्या मृतात्म्याला शांति देवो असा मला तोंडभर आशीर्वाद द्या. (पाय धरतो.)

**धनवंतरावः**—ऊठ मूर्खा, तमासगीर जगाला स्वतःच्या घमेंडखोर पोकळ पांडित्याची शोभा दाखवलीस इतकी बस्स झाली ! व्यवहारी जगाचे टक्केटोणपे खाल्लेस, पुरे झाले.

**शेवंती**—बाबा, दादा ख्रिस्ती झाला आहे. बाटला आहे—

**धनवंतराव**—बाब्या—कुलांगार दिवट्या—

**विद्याधर**—धनवंतराव, त्याला आतां आपल्या पापकर्माचा पुरा पश्चात्ताप झाला आहे. आतां पतित-परावर्तन संस्थेमार्फत याला आपण परत हिंदुधर्मांत घेऊं या.

**धनवंतराव**--बाबू, चल हो पुढें ! विद्याधर, हा पहा तुझा परदेशांत जाण्यासाठीं पासपोर्ट आला आहे. उद्यांच्याच बोटीनं हिंदुस्थान सोडण्याची तुझी तयारी आहे ना ?

**विद्याधर**--आपल्या शब्दाबाहेर—इच्छेबाहेर मी नाहीं.

**बाबूराव**—म्हणजे ? विद्याधर, खरंच तूं उद्यां परदेशांत जाणार ? बाबा, मलासुद्धां याच्याच बरोबर परदेशांत पाठवा. कंपॅनिअन, सर्व्हंट—कुली म्हणून

तरी मला बोटीवर पाय ठेवूं द्या. असा परदेशी झालोंच आहें. आतां तसा तर परदेशी मला खराखुरा होऊं दे. ज्यानं स्वधर्म सोडला त्याला स्वदेश सोडतांना मुळींच वाईट वाटायचं नाहीं.

**धनवंतराव**—आधीं हिंदु हो; मग बोल.

**अलंकार कुजना। स्वकुलकलंका। खल नादाना ॥ ध्रु०॥ कुळा काळिमा नांवलौकिका। कृष्णकीर्तिचा वाजे डंका। देवधर्म निज पुण्यशलाका। सांडिसि सोज्ज्वल शीलगुणधना ॥ १ ॥**

[ जातात.

---

## प्रसंग सातवा

[ **रावसाहेब** सचिंत बसले आहेत.]

**रावसाहेब**--माझा धर्म ! माझा पित्याचा धर्म मीं सोडला आणि वास्तविक कांहीं अपराध नसतांही रागानें वैतागून विद्याधराला घराबाहेर काढला ! पोरगं कुठं वणवणत असेल ! पण झालं हेंच ठीक झालं ! असल्या वाजिरावाच्या बेट्यांना जगाचं व्यवहारज्ञान कळून अक्कल आलीच पाहिजे. श्रीमंतींत लोळून, बापाच्या पैशावर मजा मारुन जगाचं खरं ज्ञान येत नसतं ! स्वावलंबन हाच आत्मोद्धाराचा, आत्मसामर्थ्याचा खरा राजमार्ग !

**मालती**—( प्रवेशून ) बाबा–बाबा–हा पहा आजचा ताजा टाइम्स ! यांत विद्याधरभाऊचा फोटो आला आहे !

**रावसाहेब**—विद्याधराचा फोटो ! कां बरं ? कार्ट्यानें कुठं चोरी दरवडा घालून तुरुंगाची हवा—

**मालती**—नव्हे हो बाबा ! तो विलायतेला जातो आहे–आजच्याच बोटीनं निघणार !

**रावसाहेब**—फोटो ! काय म्हणतेस ? पाहूं पाहूं–(पाहतो) अहाहा ! धन्य, धन्य मी ! कीं अशा स्वावलंबी, कर्तबगार, कुलदीपक पुत्राला जन्म दिला ! मालती, चल–माझे कपडे आण--आधीं मला डॉकवर जाऊं दे आणि बोटीवर पाय ठेवण्यापूर्वीं माझ्या लाडक्या विद्याधराला डोळे भरून पाहूं दे–कडकडून भेटूं दे–प्रेमाश्रूंनीं न्हाऊं घालूं दे–चल—

**विद्याधर**—( प्रवेशून ) बाबा ! थांबा. तुम्हांला श्रम कशाला ? हिंदु
ण्यापूर्वी तुमचे मंगल आशीर्वाद मागण्यासाठीं मीच तुमच्या अखेर भेटीला
आलों आहें—

**रावसाहेब**—कोण ? माझा बाळ-माझा विद्याधर ! ( आलिंगन देतो. )
बाळ, मला क्षमा कर. तुझी कर्तबगारी-कुशाग्रबुद्धि मीं ओळखली नाहीं आणि
केवळ पदवीधर झाला नाहींस म्हणून म्यां मूर्खानं तुझ्यावर आग पाखडली—

**विद्याधर**—बाबा, गतगोष्टींचा विचार आतां नको.

**रावसाहेब**—पण हा परदेशगमनाचा योग कसा आला ?

**विद्याधर**--केवळ धनवंतरावांच्या मेहेरबानीमुळं ! पण ते पहा, तेच
आले. ते सांगतील सारं—

**धनवंतराव**—( प्रवेशून ) ती सारी हकीगत नंतर सांगतों. रावसाहेब, हा
चा विद्याधर-एक अलौकिक रत्न-तुम्ही कांच म्हणून उकिरड्यावर फेंकून
ज्यां नामांकित नररत्नांच्या मालिकेंतला मुकुटमणि शोभेल!
राव, तुमचे उपकार फार आहेत. तुमच्या संस्थेतर्फे तो
माझा त्याला अंतःकरणापासून आशीर्वाद आहे.

घेणं न घेणं नंतर पाहूं; पण आधीं चला,

च्या उत्साही परमेश्वरा ! कर्तबगारीच्या
हानं पछाडलेलं हें पिशाच तुझ्यापायीं लोळण
पूजा बांधण्यासाठीं धांवून येत आहे. [माळ घालतो

**रावसाहेब**—वाः ! बाबूराव, कमाल केलीत ! तुम्ही म्हणे ख्रिस्तीधर्मा
दीक्षा घेतली होती ?

**बाबूराव**—केवळ नोकरीच्या भिक्षेसाठीं ! पण आतां माझा धर्म मला
कळला ! प्रिय झाला ! परमपूज्य पित्याची आज्ञा मान्य करणं हाच माझा धर्म !
हा मुलांचा धर्म !

**धनवंतराव**—आणि आपल्या मुलांना आत्मोद्धाराचा मंगल मार्ग दाखविणं
हा माझा धर्म—पित्याचा धर्म !

-शवता- ... आतां पुन्हा हिंदुधर्मीत आलास. बंधूच्या प्रेमाची ... नर प्रेमानंच करायची हाच आतां माझा धर्म !

**मालती**—भाऊ, आपल्या बंधूंना कर्तव्याच्या मार्गाकडे धांवण्यासाठ. उत्साहानं उत्तेजन देणं हाच खरा भगिनीधर्म !

**प्रभुराजा राया आतां आनंदला। आनंदला जीव हा रंगला ॥ ध्रु०॥ ज्ञानमार्ग हा मला गवसला आत्मोन्नतिच्या शैला। देशबांधवा आदर्शचि हो चिरायु लाभो तुजला ॥ १ ॥**

**विद्याधर**—अहाहा ! ताई, तुझ्या प्रेमाची फेड मी कशी करूं ? जि... भावाची ओवाळणी घातली तरी ती अपुरीच राहील ! या प्रसंगीं माझा धर्म—

**जे. हॅरी**—( प्रवेशून ) माझा धर्म—माझा धर्म कोणता ? विद्याधर, साहेब, धनवंतराव, हा अभागी पतित आपल्या पायापाशीं धांवून आल... मला आपलाच मुलगा मानून या परधर्माच्या पाशांतून ... सहा वर्षं मीं ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला—पण अ...डला आणि वास्तविक ... घराबाहेर काढला ! पोरगं मला श्रेष्ठ वाटला. मला परत हिंदुधर्मांत घ्या. ...

असल्या बाजिरावाच्या बेट्यांना

**विद्याधर**—जे. हॅरी ! आजपासून तं... जे. श्रीमंतींत लोळून, बापाच्या धनवंतराव, चला हें पतितपरावर्तनाचं स...! स्वावलंबन हाच आत्मो- जयजयकाराची गहन गंभीरगर्जना करीन; प्रिय धर्माचे मंगल आशीर्वाद घेईन आणि... आजचा ताजा टाइम्स ! यांत बोला, सनातन हिंदुधर्मकी जय ! वंदेमातरं.

**विनति प्रभु शुभपदा तव पदाला। तापदा ...री दरवडा ने लयाला ॥ धृ०॥ प्रगति-रति या जनीं। उपजवी प्रतिदिनीं। आत्मरत भारता। दे यशाला ॥ १ ॥**

REFBK-0003723
REFBK-0003723
मातरम्
३७२३